
भगवंताचा परम प्रसाद

# प्रखर प्रज्ञा



–पं. श्रीराम शर्मा आचार्य

महापूर्णाहुति पुस्तक माला क्रमांक- १३

# भगवंताचा परम प्रसाद
# प्रखर प्रज्ञा

लेखक
पं० श्रीराम शर्मा आचार्य

# सारांश

मानवी अंतरंगात प्रसुप्त पडून असलेल्या अगणित सिद्धी-विभूतींचे ज्यामधे वैभव विपुल प्रमाणात प्रकट होते, त्यास प्रतिभा म्हटले जाते. त्यांचा विनियोग लोकमांगल्याच्या उदात्त भावनेने जो करतो तो सामान्य न राहता देव कोटीत गणला जातो. या उलट त्या दैवी संपदेचा दुरूपयोग करणारे लोक असुर ठरतात. आपल्या प्रतिभेचा विकास करून जनकल्याणार्थ नि:स्वार्थ भावनेने तिचा उपयोग करणारे लोक दूरदर्शी आणि विवेकी मानले जातात.

आजच्या या दुर्दैवाच्या काळी सर्वत्र दुर्बुद्धीचेच साम्राज्य पसरलेले दिसते. त्यामुळेच आजचा जंगली मानव बनला आहे. सर्व मानवी मर्यादांचा भंग करून तो उद्धट आणि अहंकारी राक्षस झाला आहे. दुर्बुद्धीने अश्रद्धा निर्माण झाली आणि ईश्वराचे अस्तित्व आणि स्वरूपासंबंधी देखील समाजात नाना प्रकारचे भ्रम व अंधविश्वास निर्माण झाले आहेत. आपण ज्या काळात वावरत आहोत, तो प्रचंड परिवर्तनाचा काळ आहे. या काळात अनेक प्रतिभावंत पुढे येतील. ते आत्मबल विकसित करून जनमानसात पसरलेले अज्ञान आणि भ्रम दूर करतील. ही प्रक्रिया सुरू झालेली आहे. प्रतिभावंत महामानवच युगपरिवर्तन घडवून आणतील यात शंका नाही. आत्मबल संपन्न मानवच आपली तसेच अनेकांची जीवन-नौका किनाऱ्याला लावतील. अशा प्रकारे सद्बुध्दीचा महासागर उंचबळून आला की सर्वसामान्य लोकांच्या मनावर साचलेले दुर्भावनांचे आवरण भंग पावेल. विश्वनिर्माता परमेश्वराच्या दिव्यचेतनेचे अवतरण प्रत्येक शुद्ध व सात्त्विक अंत:करणात होईल आणि पाहता पाहता नवयुगाची स्थापना संपन्न होईल. यालाच म्हणावे प्रखर प्रज्ञा रूपी परम प्रसाद -ईश्वराची महती कृपा. विश्वात्मा प्रभू हे दिव्य अनुदान या काळात सत्पात्री लोकांवर उधळीत आहेत.

# चेतनेचे अस्तित्व आणि तिचा विस्तार

या जगात जड आणि चेतन एकमेकांशी गुंफलेले आहेत. काम करतांना शरीर दिसते खरे; पण खरे पाहता त्याच्या मागे चेतनेची शक्ती कार्य करीत असते. प्राण निघून गेले की धडधाकट दिसणारे शरीर निर्जीव बनते. काही कार्य करणे तर दूर, ते तत्काळ सडू-गळू लागते. त्यातून ते हेच सूचित करते की ईश्वरी चेतना सक्रिय आहे, तो पर्यंतच हे जड शरीर क्रियाशील राहू शकते. दोघे वेगळे होताच सारा खेळ संपून जातो.

एकाकी चेतनेचे अस्तित्व आहे, हे खरे आहे. त्याची निराकार सत्ता सर्वत्र व्यापून आहे. ती साकार बनते तेव्हा एखाद्या नाम-रूपाचे बंधन स्वीकारते व त्यात मर्यादित बनून राहते. म्हणून तिला आपल्या इच्छित कार्यांची पूर्ती करायची असल्यास एखाद्या शरीराचा आश्रय घ्यावा लागतो. तेव्हाच त्याचा प्रत्यक्ष परिचय घडू शकतो. निराकार म्हणजे आपल्या सृष्टीत असणाऱ्या लेसर किंवा क्ष-किरणादी प्रवाहांद्वारे कार्य करणारे तत्त्व, पण त्याचे ज्ञान होणे सूक्ष्म दर्शक यंत्रानेच शक्य होते. गाडी दोन चाकांवर चालते. ती चाके आपसात सहकार्य करीत असतात. त्याप्रमाणे या सृष्टीतील सर्व घटना, हालचाली आणि प्राणिमात्रांचे ऐच्छिक वाटणारे व्यवहार यांच्यामागे अदृश्य शक्तीच कार्य करीत असते. तिलाच आपण ईश्वर या नावाने ओळखत असतो.

विश्व ब्रह्मांडात व्यापून असलेल्या शक्तीलाच विराट् ब्रह्म किंवा परमात्मा म्हणतात. तोच सर्वव्यापी, न्यायदाता, सत्-चित्-आनंद इत्यादी विशेषणांनी ओळखला जातो. त्याचाच एक लहानसा अंश जीवधारी प्राण्यांमध्ये सक्रिय बनतो. मानव देहधारी जीवात हा अंश उच्च प्रतीचा आणि अधिक प्रमाणात असतो. म्हणून त्याच्या अंतरंगात अनंत विभूतींचे ऐश्वर्य गुप्त रूपात विद्यमान असते. त्याचा विकास करायचा की त्याला तसेच प्रसुप्त ठेवायचे, हीन-दीन अवस्थेत राहू द्यायचे, हे आपल्या वैयक्तिक प्रयत्नावर- पुरुषार्थावर अवलंबून असते.

जड चेतनेच्या मिश्रणाचा ज्या जागी विशेष प्रमाणात संचय असतो, त्याला प्रतिभा, हे नाव दिले जाते. उदार आणि उदात्त कार्यात उपयोग केल्यास त्या प्रतिभेस दैवीगुणसंपन्न असे मानले जाते. अशा व्यक्तींना महामानव या नावाने जग ओळखते. याच्या उलट त्या शक्तीचा वाईट कामात दुरुपयोग केला तर, मनुष्य दैत्य बनतो. दैत्य हा स्वतःबरोबर इतरांना सुद्धा अनेक संकटात लोटत असतो. देव-स्तरावरील माणसे पावलो पावली शालीनता आणि उदारता प्रकट करीत असतात आणि सभोवताली स्वर्गीय सुख-शांती व प्रगती-समृध्दीचे वातावरण निर्माण करतात. दैत्य प्रकृतीची माणसे उलट अधःपतन आणि पराभवाकडे वाटचाल करतात. त्यांना तात्कालिक लाभ होतांना दिसला तरी शेवटी दुर्गुणांचे फळ हे दुष्परिणामाच्या रूपानेच भोगावे लागते.

सृष्टीच्या अटल नियमात कर्म आणि त्याचे फळ यात काही काळाचे अंतर असल्याचे विधान असते. बी पेरले तरी त्याचा

वृक्ष बनण्यास काही काळ लागत असतो. गर्भाधानानंतर काही महिन्यांनी मूल जन्मास येते. आजचें दूध उद्याचे दही बनत असते. अभक्ष्य पदार्थ खाल्ले की जुलाब व वांती होण्यासाठी काही वेळ लागत असतो. मानवांमध्ये ही एक बालिश बुद्धी असते की ते कर्माचे फळ त्वरित मिळावे अशी इच्छा करतात. त्यास विलंब झाला तर फार उतावीळ व अस्वस्थ बनतात. तळहातावर मोहरीचे बी ठेवले की त्वरित त्याचे झाड व्हावे, उद्यापर्यंत वाट पाहण्याची काय आवश्यकता? अशी त्यांची भूमिका असते. उतावीळपणातून आतुरता निर्माण होते. परिणामी माणसांची मनःस्थिती प्रायः अर्धविक्षिप्त सारखी बनते. तात्काळ लाभ होत असेल तर त्या गोष्टी करण्यास तो तत्पर होतो. मग परिणामी कितीही संकटे व दुःख प्राप्त होवोत ! न जाणे विवेक व दूरदृष्टी कुठे पळून जातात. या दोन गुणांनी साधक हे अज्ञानी असतील तर ज्ञानी बनतात, दुबळे असतील तर बलवान बनतात, मंदबुद्धीचे असल्यास बुद्धिवान बनतात आणि निर्धन असल्यास धनसंपन्न बनू शकतात. मनुष्याची ही एकच घोडचूक आहे की ज्यामुळे तो आपल्या देवदुर्लभ मानवी जीवनाचा हेतू, स्वरूप आणि श्रेष्ठपणा विसरून जातो. सन्मार्ग सोडून काटेरी रानावनात भटकत फिरतो. ही त्याची चूक पाहून मनात विचार डोकावून जातो की, "मनुष्य हा खरोखर ईश्वराचा पुत्र तर नाहीच, उलट डार्विन म्हणतो, तसा तो वानराचीच संतती आहे."

ही दुरावस्था हास्यास्पद अशा दुष्ट चिंतनाचा परिणाम होय. याच कारणाने त्याच्या विचारात आणि व्यवहारात भ्रष्टाचार प्रविष्ट

होतो. परिणामी त्यास नाना प्रकारची निंदा आणि कुचेष्टा सहन करावी लागते. दुष्ट चिंतन हीच भ्रष्ट आचाराची जननी आहे. त्यामुळे त्याच्या जीवनात अनेक अनिष्ट प्रवृत्ती थैमान घालतात. मग त्यांची अवश्यंभावी कटू फळे त्यास भोगावी लागतात, हे वेगळे सांगणे न लगे. पण ही स्थिती अज्ञानजन्य भ्रमातून जरी निर्माण होत असली, तरी त्यातून सुटका नाही. दाण्यांच्या लोभाने चिमण्या आणि पिठाच्या गोळ्यांच्या लोभाने मासे आपला जीव गमावून बसतात, हे दृश्य आपण रोज पाहतो ना! जे पेरले तेच कापावे लागते, करावे तसे भरावे लागते, मग आपण कितीही सावधगिरी बाळगली असली तरी.

जीवनात भ्रांती, विकृती आणि विपत्तींचे हेच एकमेव केन्द्र होय. याच्या भोवऱ्यात सापडलेले बहुतेक लोक निषिद्ध व निंद्य आचरणात गढून जातात आणि दुर्गतीचे शिकार बनतात. ही चूक जर टाळता आली तर मनुष्य ईश्वराचा श्रेष्ठ राजपुत्र का नाही म्हणवणार? निःस्वार्थी बनून स्वर्गीय आनंदाचा अनुभव, "याचि देही याचि डोळां" भोगण्यास त्याला कोण अडवू शकेल? वासना, तृष्णा आणि अहंता यांच्या मोहपाशात जखडून त्याला दुःखाच्या कोठडीत कोण कैदी बनवू शकेल? स्मशानात राहणाऱ्या व्यक्तींसारखे नीरस, कठोर, घृणास्पद उसासे सोडणारे जीवन जगण्यास त्यांना कोण भाग पाडू शकेल?

या जगात अंधकार आहे आणि प्रकाश सुद्धा आहे, स्वर्ग आहे तसाच नरक सुद्धा आहे; पतन आहे आणि उत्थान सुद्धा आहे. कष्ट आहेत, तसाच आनंदही आहे. या दोहोंपैकी मनुष्य

आपणास हवे ते निवडू शकतो. येथे काहीही करण्याचे कर्मस्वातंत्र्य मनुष्यास आहे. कारण हा कर्मलोक आहे. अट मात्र एकच आहे की त्याला आपल्या कर्मांचे फळ भोगावेच लागते. सृष्टिकर्त्या भगवंताचा नियम कोणीही भंग करू शकत नाही.

कर्मफळाचा भोग प्राप्त होण्यास काही वेळा विलंब होऊ शकतो. कारण कर्मांचे बीजास अंकुर फुटण्यास काही काळाची गरज असते. एखादी फिर्याद कोर्टात दाखल केल्यानंतर खटला चालू होऊन शिक्षा सुनावण्यास न्यायाधीशाला विलंब लागतोच ना! ईश्वराचे साम्राज्य तर अवाढव्य आहे. त्याला न्याय देण्यास जर विलंब झाला तर मनुष्याने धीर सोडू नये आणि येथे केवळ सर्व अंदाधुंदी आहे, अशी शंकाही घेऊ नये. चातुर्याच्या बळावर आपल्या समाजात काही व्यक्ती निरपराधी म्हणून सुटून जातांना आपण पाहतो. तथापि ईश्वर हा सर्वज्ञ, सर्वव्यापी व सर्वसाक्षी असा न्यायाधीश आहे. त्याच्या नजरेतून कोणी सुटू शकत नाही. हे सत्य न कळल्यामुळेच लोक बहुधा नास्तिकतेकडे वळतात. ते कर्मफळाचा अकाट्य सिद्धांत खोटा मानून स्वच्छंदी व स्वेच्छाचारी बनत असतात. वेळेनुसार पापाचे दुष्परिणाम समोर येतात तेव्हा त्यांचा विवेक जागृत होतो.

प्रसंग असा आहे की ईश्वर आणि जीव आपसात पूर्णपणे जोडले गेले आहेत. ते दोन रूपात असूनही आंतरिक अभेद अविच्छिन्न आहे. सघन भाव आणि अती घनिष्ट साथी-सहचर अशी त्यांची पूर्ण अद्वैत स्थिती आहे. त्यामुळे समर्थ ईश्वराचा पुत्र सुद्धा ईश्वरा सारखाच समर्थ असणार. त्याला आवश्यक तो सहयोग

अवश्य प्राप्त होणारच. अभाव, दुःख, दैन्य व दारिद्र्यातून तो सहज सुटका करून घेऊ शकतो. तथापि प्रचलित दुर्दैवाने असा भ्रम पसरला आहे की जणू जीव आणि ईश्वर परस्परांहून भिन्न आहेत, अपरिचित आहेत. आजच्या विशाल महानगरात एकाच मोठ्या चाळीत राहणारे भाडेकरू परस्परांना ओळखत सुद्धा नसतात. आपण सुद्धा आपल्याच शरीराच्या विभिन्न अवयवांना कुठे ओळखत असतो?

आपल्याच शरीरात पसरलेले सूक्ष्म विषारी जंतू आपणांस माहीत नसतात. त्याच्यामुळे संभाव्य रोगांचे ज्ञान करून घेऊन त्यावर उपाय योजना सुद्धा आपण करू शकत नाही. समाजवादी म्हणविणाऱ्या मानवांचा हा उपेक्षेचा स्वभाव पाहता त्यास अज्ञानी म्हटले तर त्यात काही अयोग्य नाही. वरून वरून धष्टपुष्ट दिसणारे आतून रोगजंतूंनी ग्रस्त व अस्वस्थ असतात. वाळवी लागलेले लाकूड वरून बळकट दिसते पण आतून ते पोखरलेले व दुर्बळ बनलेले असते. अणूपासून विराट स्वरूप प्रभूपर्यंत सर्वत्र कणा-कणात एक अप्रतिम सुव्यवस्था व्यापलेली आहे. पण आपली अक्कल इथेच धोका खाते आणि आपण समजतो की या विश्वब्रह्मांडाचा निर्माता ईश्वर कुणी नाही, या शेताचा कुणी रखवालदार किंवा त्याची मशागत करणारा कोणी नाही. काहीही करा आणि कसेही वागा. खा, प्या, मजा करा. मेल्यानंतर कसला स्वर्ग नि कसला नरक? पुन्हा जन्म कुठे आहे? सर्वसामान्य जन-मनात हेच चार्वाकवादी निरीश्वरवादी तत्त्वज्ञान सध्याच्या काळात पक्के रुजले आहे.

# अश्रद्धेचे मूळ-दुर्बुद्धी

या भ्रांत विचारातून फार मोठी हानी होते, ती अशी की मनुष्य स्वेच्छाचारी व दुराचारी बनतो. आपल्या मार्गावर तो टोकदार बाणासमान काटे पसरून ठेवतो. इच्छा नसतांनाही तो अंधकारमय स्थितीला आपल्या जीवनात आमंत्रण देत असतो. दारिद्र्य,विषमता आणि विपन्नता यातूनच निर्माण होतात. जर विचार शक्ती सृजनात्मक असती आणि त्या प्रकाशात वाटचाल केली असती, तर इथे सर्व माणसे आत्मीयतेने मिळून-मिसळून वागली असती. सर्वजण हसत-खेळत जीवन जगले असते. परस्परांना उन्नत करण्यासाठी सहकार्य करीत राहिले असते. त्यांच्या जवळ मर्यादित सुख-सोयी असूनही ते सुखी-समाधानी बनले असते. त्यांच्या सभोवती स्वर्गीय वातावरण निर्माण झाले असते. प्रत्येकाला अदृश्य पारमार्थिक जीवनाचा अरुणोदय इथेच अनुभवता आला असता; पण त्या दुर्बुद्धीला काय म्हणावे? तिने तर आजच्या मानवास सर्व मर्यादाहीन, विधि-निषेधहीन व सत्-संगतहीन आदिमानव, वनमानुष बनविले आहे.

आश्चर्य असे की त्याने दोन चुका एकाच वेळी केल्या. एका आघाताने या तथाकथित प्रगतीचा विस्तार त्याने सुरु ठेवला आहे. पण त्याच बरोबर तो आपले मूळ भव्य-दिव्य आत्मस्वरूप विसरून, आपले कर्तव्य व मानवजन्माचा हेतू विसरून, आपल्याच हृदयस्थ भगवंताचे अस्तित्व नाकारून त्याची उपेक्षा करण्याची आगळीक केली. त्याचा तो अपमान करीत आहे. त्याला तो मानीत

नाही व त्याचा परिचय करून घेत नाही. आपल्यापेक्षा अधिक शक्तिमान व्यक्तीची मदत घेण्याचा लाभ लहान मुलांना सुद्धा कळतो. ज्याच्या जवळ रंगी-बिरंगी खेळणी आहेत, जो चॉकलेट देतो, प्रेमाने व वात्सल्याने वागतो, त्याच्याकडे लहान मुले सहजच आकर्षित होतात. एवढा समजुतदारपणा जर लहान मुलात आढळतो, तर मनुष्य स्वतःला भगवंताचा घनिष्ट सखा का मानीत नाही? किंवा भगवंताला आपला समर्थ मित्र का बनवीत नाही?

मोठ्या तलावात उंच पातळीपर्यंत पाणी साठते. जवळपास एखादा खळगा असला तर त्यातही पाणी साचते. त्यांची तुलना केली तर फरक जाणवतो. परंतु त्या दोघांच्या मध्ये एक नाली जोडली तर उंच तलावाचे पाणी खालच्या खोल खड्ड्यात उतरून तो भरू लागतो आणि दोघांची पातळी समान होईपर्यंत पाणी भरणे सुरु राहते. खालच्या खड्ड्यातील पाण्याची उंची निश्चित वाढते. मग वरच्या पातळीच्या तलावास थोडी फार हानी सहन करावी लागेल, तरी हरकत नसावी.

ईश्वराच्या सान्निध्यासाठी करावयाचे प्रयत्न म्हणजे अंधश्रद्धा नव्हे पण त्याची योग्य पद्धती माहीत नसेल तर मनुष्य मृगजळामागे व्यर्थ भटकणाऱ्या तहानलेल्या हरिणांसमान भटकू शकतो. त्याला उद्वेग, विपन्नता आणि अपयशच हाती लागते. अगदी मंद गतीने चालणारी मुंगी सुद्धा योग्य मार्गाने जाऊन पर्वतशिखरावर जाऊन पोचते. ईश्वर-प्राप्तीचा खरा मार्ग धरणारा मनुष्य आपले ध्येय निश्चितच गाठेल तर त्यात आश्चर्य ते कोणते?

समर्थ आप्तजनांचा सहवास आणि मदत माणसाला नेहमी

लाभप्रद ठरतात, हे सांगणे न लगे. सुगंधित वस्तू जाळली की दुकानात सजवून ठेवलेल्या अनेक वस्तुतून सुगंध दरवळू लागतो. चंदनाचे संगतीने काटेरी बाभळी सुद्धा चंदनासमान सुगंधी बनतात. असे म्हणतात की परीसाच्या स्पर्शाने काळपट क्षुद्र लोखंड सुद्धा सुवर्ण बनते. कल्पवृक्षाच्या सावलीत बसणाऱ्यांचे मनोरथ पूर्ण होतात असे आपण ऐकतो. अमृताचे काही थेंब तोंडात टाकताच प्रेतही जिवंत होते. भुंगा आपल्या संकल्पाच्या बळावर लहानशा अळीस आपणा समान बनवितो. हिरवळीच्या प्रदेशात राहणारे साप आणि टोळ सुद्धा हिरवा रंग धारण करतात. शिंपल्यात स्वाती नक्षत्रातील पाण्याचा थेंब पडताच तो मोती बनतो आणि बांबूच्या गाठीत वंशलोचन निर्माण होतो, अशी उक्ती प्रसिद्ध आहे. या सर्व उदाहरणात सत्य किती आणि मिथ्या किती, याची चर्चा येथे करायची नाही. एवढे मात्र निश्चित आहे की महामानवांच्या सहवासात राहणारे लोक त्यांच्या विशिष्ट गुणांना कमी-अधिक प्रमाणात का होईना स्वतःमध्ये धारण करीत असतात. राजदरबारात वावरणारे लोक शिष्टाचाराचे पालन चांगल्या प्रकारे करू शकतात. म्हणून प्रत्येक जण थोरांचा सहवास इच्छितो. परंतु आश्चर्य असे की आपण आप्त-स्वकीयांशी जितके प्रेम व जिव्हाळा दर्शवतो, तेवढा त्या सर्वशक्तिमान प्राणसखा परमेश्वराबाबत मात्र दाखवित नसतो. तसे झाले असते तर आज आपण ज्या क्षुद्र, अभावग्रस्त स्थितीत व अज्ञानात पिचत आपले जीवन कसे-बसे जगत आहोत, ते टळले असते.

# ईश्वरासंबंधी भ्रम

या संदर्भात एक मोठी मूर्ख समजूत सामान्य जनांच्या मनात घर करून बसली आहे. ईश्वराविषयी सिद्धांतहीन अशी भूत-प्रेत-पिशाच्या समान कल्पना करण्यात आली आहे. ते रात्रंदिवस खाण्या-पिण्याची, उपहाराची भक्तजनांकडून अपेक्षा करीत असतात. त्यासाठी ते भक्तांच्या मागे मागे भटकत असतात. पूजा-पाठ व घंटा वाजवून भजन करणाऱ्यांना ते वश होऊन ते मागतील ती वस्तू त्यांना देऊन टाकतात, त्यांच्या मनोकामना पूर्ण करतात. मग भक्तांची याचना कितीही अयोग्य किंवा अनावश्यक का असेना!

याशिवाय या कल्पनेच्या परमेश्वरात आणखी एक वाईट खोड आहे, ती म्हणजे भक्ताच्या पूजेमधे थोडी जरी भूल चूक झाली की ती क्रोधावि होतो व कालपर्यंत ज्याला त्याने भक्त मानले त्याचाच जीव घेण्यास तयार होतो. प्रसन्न होण्यासाठी तो फार सुग्रास, मनासारख्या नैवेद्याची मागणी करतो. आपला भक्त जर दुसऱ्या देवाची भक्ती करू लागला, तर ते त्याला सहन न होऊन त्या भक्ताचे उट्टे काढण्यास मागे पुढे पाहात नाही. हाच आहे आजचा समर्थ परमेश्वर! आजचे भक्तजण आपापल्या जाती, वर्ग, वंश आणि मत-मतांतरानुरूप वेगवेगळी नावे-रूपे देऊन त्याचा शोध घेतात,त्याची पूजा व भक्ती करतात. या कालभैरवाने कोणाचे किती कल्याण केले ते त्याची भक्ती करणारेच जाणोत. एक गोष्ट मात्र अशी की या स्वयंभू देवी-देवतांच्या स्वयंभू दलालांची चांदी असते. त्यांना विपुल धन-धान्य व समृद्धी लाभते. ते मनोकामना पूर्ण करण्याचा व गरिबी दूर करण्याचा डांगोरा पिटून

आपली दलाली व धंदा सतत चालवीत राहतात.

अशा सिद्धांतहीन पूजेचा व नैवेद्यांचा लोभी-लालची, कोणालाही खुश करणारा, भक्ताची उचित-अनुचित मनोकामना पूर्ण करणारा असा परमेश्वर असू शकतो का, याचा विचार केला पाहिजे. या बाबत कोणत्याही दृष्टिकोनातून विचार केला तरी नकारार्थीच उत्तर मिळते. कारण ही गोष्ट खरी मानली तर थोडा फार विवेक आणि न्यायनिष्ठा यांच्या मुळावरच घाव घातल्या सारखे होणार आहे.

परमेश्वरासंबंधीची ही कल्पना आदिम रानटी टोळ्यांची वाटावी अशी आहे. अशा परमेश्वराचे 'भगत' देवाने त्यांच्या इच्छा पूर्ण न केल्या, तर देवास शिवीगाळ सुद्धा करतांना दिसतात. या भक्तांनी ज्या इच्छा केल्या, त्यासाठी त्यांनी खूप प्रार्थना व चमचेगिरी केलेली असते. असा परमेश्वर मानला तर त्यात सत्य नसल्याने आस्तिकतेचा लाभही शक्य नसतो, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. योगायोगाने आंधळ्याच्या हाती एखादी शिकार सापडावी, कावळा बसताच फांदी मोडावी तसा थोडाफार लाभ झालाच, तरी त्यायोगे भ्रमावर आधारित मान्यतेचे समर्थन करता येत नाही.

वरील विवेचनामुळे तथाकथित पूजा-पाठ करणाऱ्यांची श्रद्धा विचलित होऊ शकेल. अर्धवट मनाने घंटा-आरती व पूजा-अर्चा करणाऱ्यांची श्रद्धा कमी होऊ शकेल. भक्तिमार्गाच्या नावावर हा भ्रामक प्रकार चालविणारे दुकानदार आपली दुकाने ओस पडतांना पाहताच प्रतिपक्षावर आक्रमण करण्यास चुकणार नाहीत. परंतु सत्यावर अधिष्ठित अध्यात्माची स्थापना करणाऱ्यांनी त्यासाठी सहनशील बनून संघर्षाची सुद्धा तयारी ठेवावी.

# दैवी शक्तीची योजनाबद्ध व्यवस्था

परमार्थ मार्गात पसरलेल्या भ्रांती आणि विकृती समजून घेतल्यावर, त्यावरील उपाय योजना सुद्धा जाणणे आवश्यक ठरते. वस्तुस्थिती काय आहे? धुराचे ढग कां निर्माण केले जातात, हे ही जाणून घेतले पाहिजे.

जगातील दृश्यमान जडपदार्थांच्या बरोबर अशी एक सर्वव्यापी नियामक सचेतन सत्ता आहे, जी अनंत कोटी ब्रह्मांडाच्या निर्मिती पासून तर न जाणो ती आणखी काय काय उद्योग करीत असते!

अस्सल गोष्टींची नक्कल या काळात खूप सुरू आहे. नकली वस्तू बहुतेक स्वस्त असतात. त्यांना मागणी सुद्धा जास्त असते. सर्वात जास्त विक्री त्यांचीच होते. नकली सोन्या-चांदीच्या मालाची विक्री भरमसाट होते. नकली हिरे-मोती खूप विकले जातात. नकली रेशीम, नकली दात जास्त चमकतात. नकली तुपाचे डबे दुकानात भरलेले असतात. नकली मध स्वस्त भावात कुठेही मिळू शकते. हे खरें असले तरी त्या नकली वस्तूंना अस्सल वस्तूंची प्रतिष्ठा कधीच लाभत नसते. त्यांची विक्री केली तर फार किंमत मिळत नाही.

अध्यात्म क्षेत्रात सुद्धा हा नकली बाजार जोरात सुरू आहे. ज्या गोष्टी उत्कृष्ट चारित्र्याच्या बळावर व पुरुषार्थ-प्रयत्नाने मिळवायच्या असतात, त्या पूजा-पाठ, स्तुतीसुमने व घंटा-आरतीने प्राप्त करून घेण्याची अपेक्षा केली जाते. मौल्यवान पदार्थासाठी योग्य किंमत न चुकविता केवळ पोकळ कर्मकांडाच्या, कथित चातुर्याच्या बळावर त्या कशा प्राप्त करून घेता येतील? मनोरथांचे

गाठोडे खांद्यावर घेऊन देवी-देवतांच्या दारात गयावया करीत भटकणारे शेवटी रिक्त हातांनी परवतांना दिसतात. श्री ज्ञानदेव हरिपाठात म्हणतात, "कैसेनि त्वरित प्रसन्न दैवत। उगा राहे निवांत शिणसी वाया॥" अशी माणसे मग आपल्या पूजा-पाठात काही उणीव राहिली असावी, अशी समजूत करून घेतात किंवा निराशेने नास्तिक तरी बनतात. आपल्या भक्तिभावनेचे फळ न मिळाल्याने भक्तिभाव सोडून देतात किंवा निराश मनाने भक्तीचे भावहीन अनुकरण करीत राहतात.

अशा पारमार्थिकांनी प्रथम पासूनच अध्यात्म दर्शन, त्याचे स्वरूप, उद्दिष्ट व प्रयोग-विधी या बाबत गंभीरपणे ज्ञान करून घेतले असते आणि पूर्ण किंमत चुकवून असली वस्तू प्राप्त करण्याचा निश्चय केला असता, तर या क्षेत्रात कुणासही निराशा लाभली नसती व तक्रार करण्याची वेळ आली नसती.

विश्वाच्या शक्ती भांडारात सर्वश्रेष्ठ बळ म्हणजे आत्मबळ होय, हे मागेच सांगितले आहे. त्याची तुलना धनबळ, बुद्धिबळ, शस्त्रबळ किंवा सत्ताबळ यांचेशी होऊ शकत नाही. आत्मबळ-संपन्न लोकांनी जे कार्य केले आहे, ते इतरांना करता आले नाही. प्रयत्न-पुरुषार्थाचे स्थान व महत्त्व आहेच; पण त्यामध्ये आत्मबळाचा समावेश नसेल, तर ते प्रयत्न फुसके ठरतात. दिवाळीमध्ये क्षणजीवी फुलझडी समान त्यांचे स्वरूप क्षणभरच मनोरंजक ठरते! अनेक असुरांनी साधनेच्या बळावर विविध सिद्धी प्राप्त करून घेतल्या. पण त्या अधिक काळ टिकू शकल्या नाहीत आणि त्यांचा शेवटही दुःखात झाला. भस्मासुर, महिषासुर, वृत्रासुर, रावण यांच्या ऋद्धि-सिद्धी शेवटी त्यांच्या आणि त्यांच्या आप्तजनांच्या

विनाशाचे व संकटाचेच कारण झाल्या. या उलट तपःक्षेत्रात मंगलमय हेतूने पावले टाकणाऱ्यांनी स्वल्पशा साधनांनी सुद्धा उच्चप्रतीचे व प्रशंसनीय यश प्राप्त केले. बुद्ध, चाणक्य, समर्थ रामदास, स्वामी रामकृष्ण परमहंस, श्री अरविंद, रमण महर्षी, म.गांधी, स्वामी दयानंद यांची परमार्थ साधना व्यक्तिशः त्यांना तर मोक्षप्रद ठरलीच, समाजाचेही असामान्य कल्याण करणारी ठरली. समग्र ऋषी समाजाची परमार्थ साधना ही उच्चकोटीची आहे. ते आकाशात तेजस्वी नक्षत्रांसमान आजतागायत चमकत आहेत, त्यांच्या समकालीन श्रद्धावंत सत्संगी लोकांना सुद्धा त्यांनी धन्य करून सोडले. उच्च प्रतीचे अध्यात्मिक-अनुदान देऊन ते त्यांचे जीवन कृतार्थ करू शकले.

भगवंताच्या कृपेने कितीतरी लहान-सहान माणसे असामान्य श्रेय-सन्मानाचे भागीदार बनले. अंगद, हनुमान, नल-नील, जांबुवंत, भगीरथ, प्रल्हाद, सुदामा, बिभीषण यांचे जीवन असेच कृतार्थ ठरले. त्यांना स्वतःच्या पुरुषार्थाने एवढे भव्य यश लाभले नसते. मनुष्याच्या स्वतःच्या प्रयत्नांची-पुरुषार्थाची महती आहेच; परंतु त्याच बरोबर दैवी कृपेच्या योगे आत्मबळ सुद्धा जोडीस असले, तर सोन्याला सुगंध लाभल्यासारखे होते. महाप्रभू येशू ख्रिस्तांचे जीवन आपल्या समोर उदाहरण म्हणून आहे. कुंती, सावित्री, द्रौपदी, सुकन्या, अरूंधती या महिलांनी सुद्धा आपल्या सांसारिक योग्यतेच्या तुलनेत आपल्या आत्मिक विभूतींच्या द्वारे कितीतरी अधिक कृतार्थता प्राप्त करून घेतली होती.

एकविसाव्या शतकात मानवी पुरुषार्थाची तर विशेष आवश्यकता आहे. सत्ययुगीन काळाप्रमाणे साधू, ब्राह्मण, वानप्रस्थ,

परिव्राजकांना व इतर अगणित जनांना आत्मोन्नतीच्या सेवा-साधनेत सुद्धा स्वतःस तापवावे व खपवावे लागेल; परंतु त्यांनी असे मानू नये की एवढे मोठे कार्य केवळ मानवी प्रयत्नाने पूर्णत्वास जाईल. आपल्या लहानशा कुटुंबातील मर्यादित क्षेत्रात उद्‌भवणारे वाद-विवाद, मनोमालिन्य व लोकव्यवहारातील भांडण-तंटे आपणास दूर करता येत नाहीत, तर ६०० कोटी माणसांच्या समस्या कशा दूर करू शकणार? या कार्यात मानवी पुरुषार्थाच्या पाठीशी दैवी शक्तीची जोड सुद्धा असावीच लागेल. केवळ मानवी पुरुषार्थ आपल्या उणीवा, चुका, दुर्बलता आणि विरोधी परिस्थितीच्या योगे यशाऐवजी अपयशाचेच धनी झाल्याचे अनेक जागी दिसून येते.

## आत्मबळातून लाभलेली विकसित प्रतिभा

अध्यात्मबळाचे संपादन करणे हे कठीण नसून, सोपे-सरळ आहे. त्यासाठी चित्तशुद्धी आणि लोककल्याणार्थ सेवाभाव यांना आपल्या जीवनकार्याचे अभिन्न अंग बनवून घेणे, एवढेच पुरेसे आहे. व्यक्तित्वात तेज आणि प्रखरता या दोन आधारांवर हे कार्य पूर्ण करता येते. एवढे करता आले तर दैवीकृपा-अनुग्रहाचा वर्षाव बिना प्रयास घडतो आणि आत्मबळ आपल्या अंतरंगातून विपुल प्रमाणात उचंबळून येते. गुहक, शबरी, खार, अस्वल-वानरे, बाल-गोपाळ यांचे भौतिक बळ फारच मर्यादित होते. पण त्यांनी आपल्यात देवत्वाचा अंश वाढविला. त्यामुळे ते इतके मनस्वी बनले की इतिहासकारांना त्यांची आदरपूर्वक दखल घ्यावी लागली. सुग्रीवाच्या विजयामागे त्याची स्वतःची बलिष्ठताच केवळ कारणीभूत

नव्हती. नरसी मेहता यांना आपल्या व्यवसायातून अभीष्ट धन लाभले नव्हते. अमृतसरचे सुवर्णमंदिर कुणा एका धनवंताचे कार्य नव्हते. या सर्वांच्या पाठीशी अदृश्य दैवी सहयोग सुद्धा जागृत सहकारी होता. ध्रुवाला ब्रह्मांडाचा केन्द्र बनण्याचे श्रेय त्याच्या तपोबळामुळेच शक्य झाले होते. महर्षी अगस्तीचे समुद्र प्राशन आणि केवळ परशूच्या द्वारे लक्षावधी-कोट्यवधी दुष्टांच्या 'ब्रेन वॉशिंगचे' जे कार्य परशुरामाकडून झाले ते कुणा समर्थ गुरुंच्या धर्मोपदेशाच्या मानाने कमी नव्हते.

सत्ययुग हे ऋषियुगाचेच प्रत्यक्ष रूप होय. आसुरी वृत्ती वाढल्या की कलियुग म्हणजेच कलह युग येऊन थडकतो. उच्चकोटीचे पौरुष जेव्हा कार्यक्षेत्रात उतरते, तेव्हा केवळ मूठभर व्यक्ती व प्रतिभावंतच बदलतात असे नव्हे, तर समग्र वातावरणाचाच कायापालट होत असतो. धोब्याच्या भट्टीत मळकट कपडे सुद्धा चमकू लागतात. भट्टीतून माती समान दिसणारे क्षुद्र लोखंड बळकट पोलाद बनते. त्याची कित्तीतरी अवजड यंत्रे बनून विविध चमत्कारिक कामे संपन्न करतांना आपण पाहतो. आत्मशक्तीचे स्वरूप व सामर्थ्य सुद्धा याच स्तराचे अनुभवास येते.

एकविसाव्या शतकापासून सुरू होणारे युग निर्माण आंदोलन प्रतिभासंपन्न व्यक्तींपासून सुरू होईल पण त्याच्यामागे दिव्यचेतना अदृश्यरूपात उभी असेल. फ्रान्सची एक कुमारी कन्या ''जोन ऑफ आर्क'' ही युद्धाबाबत अनभिज्ञ असूनही तिने युद्धात विलक्षण रणकौशल्य दाखविले आणि आपल्या देशाचे स्वातंत्र्य वाचविले. म. गांधी आणि संत विनोबाजी यांच्या हातून जे महान कार्य संपन्न झाले ते ईश्वरी दिव्यचेतनेच्या पाठबळावरच शक्य होते.

अन्यथा ते फार तर बॅरिस्टर, अभिनेता, मिनिस्टर यांच्या रूपातच राहिले असते.

विश्वविजयाची योजना ऐकून चंद्रगुप्त मागे पुढे पाहू लागला. तेव्हा आर्य चाणक्य म्हणाले, "तुझी, दासीपुत्राची मनःस्थिती मी जाणतो; पण तू आता त्यातून बाहेर पडावेस आणि स्वतःस आर्य चाणक्य यांचा वरदपुत्र मानावे. त्यास साजेसे वागावे. विजय प्राप्त करण्याची जबाबदारी तुझी नसून माझी आहे." छत्रपती शिवाजी महाराज सुद्धा आपले थोडेसे सैन्य पाहून विचारात पडले की मोगलांच्या विशाल सैन्याशी आपण कसे लढू शकू? समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या हाती मात्र भवानीची अक्षय तलवार दिली आणि म्हटले, "तू छत्रपती झालास. पराभवाचा विचारच मनात आणू नकोस."

महर्षी विश्वामित्रांनी राम-लक्ष्मणांना यज्ञ-रक्षणाच्या निमित्ताने नेऊन त्यांना बला-अतिबला विद्येने संपन्न केले. त्यामुळेच ते राक्षसांशी लढून त्यांचा आतंक नष्ट करू शकले. त्यांनी आदर्श रामराज्याची स्थापना केली. ते "सत्य-युगाचे पुनरावर्तनच" होते. महाभारताच्या ऐन युद्ध प्रसंगी अर्जुन संभ्रमित व शंकाकूल झाला होता. तो म्हणाला, "केशवा,मी जीवन निर्वाहासाठी काहीही करू शकेन. त्यासाठी आपण मला या भयानक परिणाम घडविणाऱ्या महायुद्धात का लोटत आहात?" त्यावर उत्तरादाखल भगवंताने त्याला एकच गोष्ट सांगितली की " या कौरवांना मी आधीच ठार केले आहे. तू श्रेय घेण्यासाठी पुढे ये. एरवी तुझ्या सहयोगाशिवाय सुद्धा जे होणार आहे, ते चुकणार नाही. नुकसान तर तुझेच होईल. विजयी होण्याचे श्रेय तू गमावून बसशील. राज्यसिंहासनाचा

मानसुद्धा हातचा निघून जाईल.''

अर्जुनाने परिस्थिती समजून घेतली व म्हणाला, ''करिष्ये वचनं तव'' म्हणजे, तुमचा आदेश पाळीन. अशीच मनःस्थिती जर अंगद, हनुमंत, नल-नील यांची राहिली असती तर ते कसे बसे जीवन जगले असते; पण त्यांना रामायणाद्वारे जी अक्षयकीर्ती लाभली, त्यापासून ते वंचित राहिले असते. युग निर्मितीच्या विराट कार्यात श्रेय कोणासही मिळो, परंतु त्यामागे खरी शक्ती आहे ईश्वराचीच. यापुढेही असेच होईल. त्या ईश्वरी शक्तीनेच नवसृष्टीकरिता योजना तयार केली असून त्यासाठी उपयुक्त साधने व संधी सुद्धा तयार आहे. हा भगवंताचा संकल्प असून तो यशस्वी होणारच आहे.

# मानवी पुरुषार्थ आणि दैवी शक्ती यांचा संगम

संकटांना धैर्यपूर्वक पराभूत करणारे साहस लाभणे ही ईश्वरी कृपाच असते, त्याचा विशेष असा अनुग्रह असतो. राजकीय, सामाजिक किंवा बौद्धिक क्षेत्रातील क्रांतिकारकांचे यश हे त्यांच्या ठायी असणाऱ्या साहसामुळेच लाभले होते. अशा महान साहसी वीरांमध्ये नेपोलियन सारख्यांची गणना होते. इंग्लंडवर जर्मनीने आक्रमण केले असता इंग्लंड पराभवाच्या छायेत होते. नागरिकांमध्ये भय आणि निराशा पसरली होती. तेव्हा तत्कालीन पंतप्रधानांनी एक घोषवाक्य दिले होते- ''व्ही फॉर व्हिक्ट्री'' हे घोष सूत्र घरोघरी भिंतीवर लिहिले गेले. परिणामी जनतेत नव्याने उत्साहाचे प्रचंड वारे वाहू लागले. ''शेवटी विजय आमचाच होणार'', असा प्रचंड

आशावाद जनतेत जागृत झाला. जनतेचे मनोबळ वाढले. त्यामुळे सैनिकांचा पराक्रमही वाढला. पराभवाच्या दारापर्यंत पोहचलेले इंग्लंड शेवटी विजयी झाले. दुष्टकार्यात चोर-डाकू सुद्धा साहस दाखवतात. उच्च ध्येयासाठी जेव्हा साहस उचंबळून येते, तेव्हा साधनांची कमतरता असूनही मनोबळ इतके प्रचंड असते की पराजय हा विजयात बदलून जातो. अशा प्रकारचे साहस हे दैवी स्वरूपाचेच असते. क्षुद्र माणसे तर स्वार्थासाठी लढाई-झगडे करण्यातच पुरुषार्थ दाखवित असतात. गल्लो-गल्ली कुत्री भांडतांना सर्वत्र आपण पाहतोच.

आगामी काळात प्रतिभासंपन्न लोकांना युग परिवर्तनासाठी अभूतपूर्व आणि ऐतिहासिक स्वरूपाचा पराक्रम व संघर्ष करावा लागणार आहे, कारण पृथ्वीवर इतके व्यापक आणि कष्टसाध्य परिवर्तन व क्रांती होण्याची ही पहिलीच वेळ म्हणावी लागेल. राजे-महाराजे आणि त्यांचे सामंत आपापल्या सैन्य आणि साधनांच्या बळावर लढाया करीत. आजच्या काळात राजा आणि प्रजा या सर्वांच्या विचारात व आचरणात नवे विचार, चिंतन प्रविष्ट झाले आहे. आता वरिष्ठ प्रतिभावंतांनी पुढे येऊन -भगवान बुद्धाप्रमाणे धर्मचक्र-प्रवर्तना सारखे कार्य सामूहिक रूपात संपन्न करणे आवश्यक आहे. यासाठी दैवी अनुदान आवश्यक आहे. एखाद्या आक्रामक सैन्याला हवामानाची प्रतिकूलता मध्येच थोपवून ठेवू शकते. त्याप्रमाणे दैवी अनुदानाच्या अभावी समग्र परिवर्तनाचा लढा हा मध्येच खोळंबू शकतो. एवढ्या प्रचंड क्रांतिकारी अभियानात साधन-रहित वर्गाचा लढा हा लहान-सहान संकटांनी सुद्धा अवरुद्ध

होऊ शकतो. नव्हे त्यातून उलट अधिक संकटे कोसळू शकतात. पाठीमागून हवेचा रेटा असेल तर वाहने सहजगत्या वेगाने धावू शकतात. मात्र समोरचा हवेचा प्रवाह हा पावलो पावली पुढे जाण्याचा वेग मंद करू शकतो.

# पात्रतेनुसार दैवी कृपेची प्राप्ती

विश्वमानवाचे भाग्य नव्याने घडविणाऱ्या नवसृजनाच्या या आंदोलनात दैवीशक्तीचे फार मोठे अनुदान जुळलेले असेल.' यासाठी कोणाकडे याचना करण्याची गरज पडणार नाही. आपली पात्रता फक्त अनुरूप करून घेतली तर इतर सर्व गोष्टी आपोआप आकर्षित होतील. पाऊस येत असतांना रिकामे भांडे बाहेर ठेवले की ते पाण्याने आपोआप भरून जाते. लहान वाटी असेल तर तिच्यामध्ये थोडेसेच पाणी साठेल; मोठी बादली जास्त पाणी भरून घेईल. हा पात्रतेचा चमत्कार होय. सखोल सरोवरे काठोकाठ भरून जातात. पण उंच टेकडीवर पाण्याची काही डबकीच तेवढी साचू शकतात. सुपीक काळी जमीन पावसाळ्यात हिरव्या गालीचाने बहरून जाते. पण नापीक खडकाळ जमीन पूर्ववत कोरडीच राहते. नद्यांचे पात्र जमिनीपेक्षा खोल असते आणि म्हणून चारही दिशेचे पाणी येऊन नदीत सामावून वाहू लागते. शिष्यवृत्ती, प्रतिस्पर्धा, पुरस्कार प्राप्त होणे हा पात्रतेचाच चमत्कार असतो. हा लाभ केवळ प्रशंसक व खुशामत करणाऱ्यांनाच प्राप्त होत नसतो. एखादा अधिकारी खोट्या स्तुतीने खुश होऊन अपात्र, कनिष्ठ कर्मचाऱ्यास बढ़ती देत असेल, तर त्याच्या न्यायनिष्ठेवर कलंक लागतो आणि

कर्तव्य-भ्रष्टतेबद्दल व पक्षपातीपणाबद्दल त्याची चौकशी होऊ शकते. हा जीवनाचा शाश्वत नियम आहे. भगवंतावर आणि त्याच्या न्यायनिष्ठेवरही तो लागू पड़तो.

पात्रता मिळविली की इतर कोणतीही खुशामत न करताच आपल्या योग्यतेनुसार, स्तर, पद-प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकते. दैवी शक्तीच्या अवतरणासाठी पहिली, अट म्हणजे-साधकाची पात्रता, पवित्रता आणि प्रामाणिकपणा. सर्वत्र याच गुणांचा शोध व मागणी होत असते. मुलगी उपवर व विवाहयोग्य झाली की योग्य वर प्राप्त करण्यासाठी पालकांची धावपळ सुरू होते. एखादा कुपात्र युवक शेजारीच राहत असेल, तरी त्याच्याकडे पालक ढुंकूनही पाहत नाहीत. खुशामत-शिफारस किंवा आपणहून मागणी घालणाऱ्या अपात्र वराची कन्यापिता दखलही घेत नसतो. आध्यात्मिक ऋद्धि-सिद्धी या तर परमेश्वराच्या कन्या आहेत. त्यांच्या प्राप्तीसाठी-"येथे पाहिजे जातीचे। येरा गबाळाचे काम नसे॥" ही संत उक्ती प्रमाण आहे. अंतर्बाह्य सर्वांग सुंदर व सुपात्र असणे ही गोष्ट ईश्वरी कृपेसाठी अपरिहार्य अट आहे.

## उदारता ही प्रामाणिकपणाची जननी

दुसरा सद्गुण सुद्धा तेवढाच आवश्यक आहे. तो म्हणजे- 'उदारता'. ज्याच्या अंतःकरणात करुणा, ममता, सेवा, सहाय्यता आणि कोमलता असते, तोच इतरांचाही निष्ठुरपणा दूर करू शकतो. त्यांना करुणासागर बनवू शकतो. इतरांवर करुणा-दयेचा

वर्षाव करण्यात ज्यांना आनंद वाटतो, त्यांच्यावरच ईश्वरी कृपेचा वर्षाव होऊ शकतो. कठोर व निष्ठुर जनांची संकुचित स्वार्थी वृत्ती पाहून तर शेजारी-पाजारीच नव्हे, भगवंताची कृपा सुद्धा माघारी परत जाते. आसुरी लोकांची निष्ठुरता आणि अनैतिकता प्रसिद्ध आहे. त्यांचा अंत सुद्धा शेवटी प्रतिपक्षाच्या निष्ठुरपणानेच घडतो. हा ईश्वरी न्याय आहे. असुरांच्या कथा बहुधा या गोष्टीचे प्रमाण देतात.

पूजा-अर्चा करण्याचा हेतू आत्मशुद्धी आणि सत्प्रवृत्ती संवर्धन हाच आहे. त्यातूनच उदारपणा जागृत होत असतो. भावनात्मक कर्मांनी ही दोन्ही उद्दिष्टे साध्य झाली तर समजावे की पूजा-पाठाचा खरा लाभ पदरी पडला. पूजे-अर्चेचे कार्य सुरू असून त्यातून भावनात्मक चित्तशुद्धी व विकास होत नसेल, तर समजावे की ती केवळ आत्मवंचना आहे. दुर्दैवाने आजच्या काळात सर्वत्र हेच आढळते. देवी-देवतांची खुशामत करण्यासाठी, त्यांची फसवणूक करण्यासाठी चित्र-विचित्र पूजा-पाठ केले जातात आणि त्याद्वारे मनोवांछित फळाची अपेक्षा केली जाते. आपण समजतो तेवढे देवी-देवता मूर्ख व अविचारी नसतात. एखादा क्षुद्र व हीन दर्जाचा मनुष्यच तथाकथित स्थूल उपचारांनी व स्तुती-स्तोत्रांनी भ्रमात पडू शकेल, देव नाही.

देवी-देवतागण हे सत्य जाणून घेण्यात प्रवीण असतात आणि ते इतके दरिद्री नसतात की लहान-सहान नैवेद्यासाठी धावत येतील, भक्त जे मागेल ते फुकटात देऊन टाकतील. याच कारणाने

अपात्र लोक सकाम पूजा-पाठ करूनही अपेक्षित कामनापूर्तीपासून वंचित राहतात. सुरुवातीस लॉटरी लागण्याचा जो उत्साह असतो, तो हळूहळू ओसरत जातो. कारण वस्तुस्थितीची जाणीव होऊ लागते. कमी किंमत देऊन बहुमोल वस्तू मिळविण्याचा हव्यास बाळगतात, तसे न घडल्यामुळेच बहुधा आस्तिकता कमी होत जाते व त्याच्या जागी देवी-देवतांबाबत उपेक्षा व शंकाकुशंका निर्माण होतात. कधी कधी लोक देवी-देवतांना दोष देण्याबरोबरच आपणांसही अभागी मानून दैवाला दोष देऊ लागतात. भविष्यात अशी माणसे नास्तिक सुद्धा बनू शकतात.

आपण याबाबतचे सत्य काय ते समजून घ्यावे. एखाद्याच्या प्रामाणिकपणाबाबत पूर्ण खात्री पटेल तेव्हाच त्याच्यावर एखादी मोठी जबाबदारी किंवा मोठा अधिकार सोपविला जातो. ईश्वराच्या दरबारात सुद्धा हाच नियम आहे. तेथे साधनेचा अर्थ जीवनाच्या प्रत्येक कार्यात आदर्शवाद आणि प्रामाणिकपणा असा लावला जातो. या कसोटीस जो उतरतो, त्यास सुवर्णकारासमान योग्य मूल्य प्राप्त होत असते. मात्र पितळावर सोन्याचे पॉलिश देऊन सोन्याची बतावणी करणारे वंचक सर्वत्र तिरस्कृत होतात.

लहान बालकास उभे राहण्यासाठी आणि चालणे शिकण्यासाठी तीन चाकी हातगाडी बनवून दिली जाते. मुलास तर आपल्याच पायांवर उभे राहावे लागते. परंतु गाडीची मदत मिळून त्याचे काम सोपे होते. त्याचप्रमाणे पूजा-अर्चा ही मनुष्याचे व्यक्तिमत्त्व प्रामाणिक बनविण्यासाठी केवळ पोषक ठरते. भक्तिसाधना करणारे अंतरंगात जर क्षुद्र व हीन पातळीचे असतील तर समजावे की

त्यांना साधनेचा खरा भाव कळलाच नाही. त्यांनी योग्य प्रकारे साधना केली नाही.

मनाने उदार होणे हे सुद्धा ईश्वर-भक्तीचे अविभाज्य अंग आहे. मनात उदारपणा असेल तर अंतःकरणात निष्ठुरपणा व संकुचित स्वार्थीपणा टिकू शकत नाही. संत आणि भक्त जन हे बहुधा श्रीमंत नसतात. कारण त्यांना प्राप्त झालेल्या धनाचा अल्पसा अंश ते आपल्या प्रपंचात लावतात आणि बहुतांश रक्कम पुण्य-परमार्थ कार्यात उदारपणे खर्च करतात. ही उदारताच त्यांना दैवी औदार्य प्राप्त करून दे.ा असते. ढग हे उदारपणे जल वर्षाव करतात. तेव्हा समुद्र त्यांना मोकळे राहू न देता पुनः जास्त पाण्याने भरून देत असतो. नद्या जमिनीवर आपली जलसंपत्ती वाहावतात. तहानलेल्यांना पाणी देऊन त्यांना तृप्त करतात. त्यांना या कार्यात पाणी कमी पडू नये याची जबाबदारी हिमालयात विरघळणारे बर्फ घेत असते. वृक्ष विनामूल्य फळे देतात. परिणामी त्यांना नवीन हंगामात तेवढीच नवीन फळे पुन्हा विनामूल्य प्राप्त होत असतात. गाई दूध देतात. पण त्यांचे स्तन रिकामे राहत नसतात. सकाळी रिकामे झालेली स्तने सांयकाळपर्यंत पुन्हा दुधाने भरून जातात. पृथ्वी वारंवार अन्न-धान्य देत असते. तिच्यातील सुपीकपणा अनादिकाळापासून विद्यमान आहे. पुढेही अनंत काळपर्यंत ती सुपीकच राहणार आहे. ज्यांच्या आचार-विचारात उदार सेवा-भावनांचा संचार होतो, त्या प्रामाणिक व्यक्तीस समाजाकडून सन्मान, प्रतिष्ठा, सहकार्य आणि ईश्वराची कृपा त्याच प्रमाणात सातत्याने प्राप्त होत राहील.

# जीवन-साधना आणि ईश-उपासना

आस्तिकता किंवा आध्यात्मिकता यांचा प्रत्यक्ष क्रियात्मक पैलू सुद्धा आपल्या परीने योग्यच आहे. आपले इच्छित ध्येय साधण्यासाठी त्यामुळे साहाय्य लाभते आणि ध्येयसिद्धी सुलभ होते. परंतु कोणीही अशी कल्पना करून घेऊ नये की पूजे-अर्चेचे कर्मकांड पूर्ण केले म्हणजे अध्यात्माची फलश्रुती व ऋद्धि-सिद्धीची प्राप्ती होईलच. कर्मकांड हे केवळ एक प्रतीक आहे. त्याद्वारे केवळ दिशा-निर्देश होऊ शकतो, मैलाचा दगड खुणा संकेत दाखवितो तसे!

साधनेचे उद्दिष्ट आहे- जीवन साधना, म्हणजे आपणा स्वतःसाठी कठोरपणा आणि इतरांबाबत उदारता बाळगणे. संत म्हणतात तसे- रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग।
अंतर्बाह्य जग आणि मन॥

कठोरपणाचा भाव आहे-जीवनात संयम व नियमांचे निष्ठापूर्वक पालन करणे. इंद्रिय संयम, विचार संयम आणि अर्थ संयम हेच साधनेचे तीन चरण होत. यांनाच साधनेतील तत्परता म्हणतात. यांच्या सिद्धीसाठी अपव्यय थांबवावा लागतो. संयमामुळे जो वेळ, श्रम, चिंतन व द्रव्य यांची बचत होते, ती शुभ कार्यासाठी खर्च करण्याची काळजी घ्यायची असते. एवढे होऊ शकले तर समजावे की संयम-साधना, तप-साधना योग्य दिशेने प्रगतिपथावर जात आहे. त्याची फलश्रुती ही उत्कृष्ट सिद्धी अवश्य प्रदान करील.

पूजा-अर्चा केवळ प्रतीक असतात. त्यातून उपासना आणि त्याचे ध्येय या बाबतचे ज्ञान प्राप्त होऊ शकते. देवासमोर दिवा

लावणे म्हणजे दिव्याप्रमाणे तिळ तिळ जळणे व इतरांना प्रकाश देण्याची मनीषा जागृत ठेवणे. देवास फुले वाहणे यातील अंतरंग भाव आपले जीवन व्यवहार फुलांसमान सुंदर, कोमल व शोभिवंत करण्यात काही हातचे न राखणे. अक्षत अर्पणाचा संकेत असा की आपल्या मिळकतीपैकी एक अंश नियमितपणे पारमार्थिक-कल्याण कार्यात खर्च करणे. चंदनाचे गंध देवास लावणे म्हणजे- आपल्या परिचय-प्रभाव क्षेत्रात आपल्या गुणवैशिष्ट्यांचा शीतल-सुगंध पसरविणे. नैवेद्य अर्पणाचा भाव असा की-आपल्या स्वभावात व आचरणात मधुरतेचा जास्तीत जास्त समावेश करणे. जपाचा हेतू आहे-आपल्या मानसिक चेतनेत ज्ञानाचा व भक्तिभावाचा प्रकाश पसरविणे.

प्राणायामाचा उद्देश म्हणजे आपण स्वतःला सर्व दृष्टींनी प्राणसंपन्न करणे. समग्र साधना-विज्ञानाचे तत्त्वज्ञान एकाच बिंदूवर केंद्रीत आहे की आपले अंतर्बाह्य जीवन सातत्याने मानवी जीवनाच्या गौरवास अनुसरून जगण्यात यावे. जीवनातून सुप्त व निषिध्द पापमय वृत्ती-प्रवृत्तींचे समूळ निर्मूलन व्हावे. मनुष्य जितका निर्मळ व पवित्र होत जातो, तितका तो आपल्या अंतरंगात तत्परतेने ईश्वराचे दर्शन घेऊ लागतो. यासच "प्रसुप्तीचे रूपांतरण" म्हणतात. आत्मज्ञानाची प्राप्ती वा आत्मसाक्षात्कार म्हणतात तो हाच. या क्षेत्रात जो जितकी प्रगती करून घेतो, तो तितकाच उच्चकोटीचा सिद्धपुरुष आणि महामानव मानला जातो.

सडक आपणास वाटचाल करण्यात मदत करते खरी; पण ती पार करण्यासाठी आपल्या पायात शक्ती असणे आवश्यक असते. भजन-पूजन हे एक प्रकारचे स्नान समजावे. त्यामुळे

अंगावरचा मळ दूर होतो. पण तेच सर्वस्व नव्हे. जीवन-धारणेसाठी खाणे-पिणे, जागणे-झोपणे यांची सुद्धा आवश्यकता पडते. पूजा-अर्चा महत्त्वाची आहे. ती नियमितपणे करावी, तथापि पूजा-पाठ केल्यावर मग आत्मोन्नतीसाठी पात्रतेची व प्रामाणिकतेची गरज नाही, अशी भ्रामक कल्पना मात्र करून घेऊ नये. पूजा-अर्चा म्हणजेच समग्र अध्यात्म नव्हे, हे विसरू नये. आपल्या आध्यात्मिक उन्नतीचे परीक्षण करावयाचे असेल तर एकच मार्ग आहे. तो म्हणजे इतर सामान्य जनांच्या तुलनेत आपण आपल्या व्यक्तिमत्त्वात, चिंतन-व्यवहारात उत्कृष्टता-उदारता किती प्रमाणात समाविष्ट केली आहे, याचा पडताळा घेतला पाहिजे.

सोन्याला कसोटीच्या दगडावर घासल्यावर सुद्धा अग्नीत तापवितात. तेव्हाच त्याच्या खरेपणाची, अस्सलपणाची खात्री पटते. तद्वतच आपल्या लोकमांगल्याच्या व सत्प्रवृत्ती संवर्धनाच्या कार्यात किती जास्त अनुदान दिले जात आहे, हे पाहणे देखील आवश्यक आहे. जगाच्या इतिहासात ईश्वर भक्तांची, महामानवांची हीच दोन वैशिष्ट्ये आहेत. ही दोन गुण-वैशिष्ट्ये विकसित करूनच त्यांनी श्रेष्ठतम अवस्था प्राप्त करून घेतली आहे. इतर कोणासही हाच मार्ग मोकळा आहे. याच्या शिवाय दुसरा "शॉर्ट कट" नाही. जीवन व्यवहार अधम स्तरावर ठेवून कोणतीही भरीव प्रगती होऊ शकत नाही.

जादूगार हा आपल्या कथित जादूचे चमत्कार दाखवून लोकांची गर्दी जमवितो व क्षणभर लोकांना चकित करतो, तद्वत याही क्षेत्रात काही लोक चातुर्याने हात चलाखी करतात. अप्रामाणिकपणे काही काळ लाभ पदरी पाडून घेतात हे ही खरे.

जादूगार लोक हातावर मोहरी उगवून तर दाखवतात; पण त्याचे तेल मात्र काढून दाखवित नसतात. कारण ते सारे क्षणिक व खोटे दृश्य असते. पाण्याचे बुडबुडे क्षणभर नाचतांना दिसतात पण दुसऱ्याच क्षणी ते कोठल्या कोठे अदृश्य होतात.

धातूंच्या खाणी जेथे असतात, तेथून आपल्या सजातीय धातुकणांना त्या हळूहळू आपल्याकडे खेचत असतात. त्यांचा क्रमाक्रमाने विस्तार होत असतो. जेथे घनदाट वृक्ष वल्ली असतात, तेथे ते आपल्या हिरवळीच्या चुंबकत्वाने आकाशातून ढगांना आकर्षित करतात व त्याला पावसाचा वर्षाव करण्यास भाग पाडतात. उमललेल्या फुलांवर फुलपांखरे न जाणो कोठून उडत येतात. तद्वतच प्रामाणिकता आणि उदारता यांचे वैभव जेथे जेथे वाढते ते स्वतःच चुंबक रूप धारण करते आणि अखिल ब्रह्मांडात आपल्या सजातीय चेतनेस आकर्षित करून आत्मसात करीत असते. ईश्वरीय अंश याच न्यायाने सामान्यजनांपेक्षा प्राणवान जनांमध्ये निश्चितपणे अधिक प्रमाणात आढळतो. सामान्य प्राणांना महाप्राणाच्या रूपात परिवर्तित करणे हाच ईश्वर-उपासनेचा उद्देश आहे. याचे परिपक्व फळ म्हणजे सामान्य मनुष्य मनीषी बनतो, क्षुद्राचा महान होतो, नराचा नारायण बनतो.

# प्रखर प्रतिभेची गंगोत्री

मनुष्य काहीही मिळविण्यास आणि मिळविलेल्या वैभवाचा दुरुपयोग वा सदुपयोग करण्यास समर्थ आहे. ईश्वराने कर्मफळ आपल्या स्वतःच्या हातात ठेवले आहे; तथापि कर्म करण्याचे

स्वातंत्र्य मनुष्यास प्राप्त आहे. तो आपल्या इच्छेनुसार वागू शकतो. संपादन केलेल्या प्राणशक्ती बाबत सुद्धा हाच नियम लागू पडतो. दैत्य स्वभावाचे लोक भौतिक शक्तींचा जसा दुरुपयोग करतात, तद्वत ते आत्मिक विभूतींचा सुद्धा दुरुपयोग करू शकतात. तांत्रिक, अघोरी, कापालिक साधक अशीच कष्टप्रद कृत्ये करीत असतात.

प्राणशक्तीचा उपयोग भौतिक लाभासाठी सुद्धा करता येतो. ज़िद्द बाळगून राहणारी माणसे सामान्य परिस्थितीत जन्म घेऊन सुद्धा सभोवतालचे वातावरण आपणांस अनुकूल करून घेतात आणि आपल्या व्यवहार कौशल्याचे दर्शन घडवितात. आपापल्या व्यवसायात प्रगती करून घेतात. धनिकवर्ग, बलवान, विद्वान आणि कलावंत हे तत्परता, तन्मयता, कुशलता व सावधपणा या गुणांच्या बळावर आपले इच्छित ध्येय साध्य करून घेतात. याच्या उलट अडाणी व स्थूल बुद्धीची माणसे कसे बसे पोट भरीत असतात. काही वेळा मूर्खपणामुळे ते आपल्या भोवती अशी भानगड निर्माण करतात की त्यामुळे त्यांना संकटे झेलावी लागतात. बेसावध आणि व्यवहार-शून्य लोक हे दैनंदिन व्यवहारातही अशा चुका करतात की परिणामी त्यांना सुख-शांतीने जगणे सुद्धा कठीण होते, विशेष यश आणि समृद्धी प्राप्त करणे तर दूरच राहो.

भौतिक जीवनात आपल्या जिद्दीचा व उत्साहाचा योजनापूर्वक वापर करणारे लोक इच्छित यशाच्या दिशेने अग्रेसर होत असतात. संपत्तिवान व प्रगतिशील लोकांना यशाचे अधिष्ठान मानले जाते. माणसे कधी कधी हातचलाखी करूनही यशस्वी होतात; परंतु ही उदाहरणे क्वचितच आढळतात. एवढे मात्र निश्चित

आहे की जिद्द आणि चिकाटी असल्याशिवाय यथार्थ उन्नतीच्या अवस्थेस कोणीही पोहचू शकत नाही.

सामान्य जनात दोन वर्गाची माणसे आढळतात- एक आळशी आणि दुसरा पुरुषार्थी. त्यांनाच गरीब-श्रीमंत, यशस्वी-अपयशी अशीही नावे देता येतात. परंतु यांच्यापेक्षा आणखी तिसरा व उच्च स्तर आहे, त्यास देव-मानव नाव देऊन त्याचा गौरव केला जातो. प्रतिभासंपन्न लोक हे यश -सिद्धी प्राप्त करून घेतात. काही त्याचा दुरुपयोग करून जनमनात पतित ठरतात, तथापि ज्यांनी आपल्या गुण-कर्म-स्वभावाचे नियोजन करून स्वतःला सुसंस्कृत करून घेतले आहे, त्यांच्यासाठी आत्मसमाधान, सामाजिक प्रतिष्ठा आणि दैवीकृपा-ही तीन वरदाने सुरक्षित असतात आणि ते दिवसेंदिवस उन्नतीच्या सर्वोच्च शिखराकडे वाटचाल करीत जातात. खराखुरा योगाभ्यास म्हणजे-व्यक्तिमत्त्वाचे शुद्धिकरण आणि उदात्तीकरण. इहलोक आणि परलोकातील अभीष्ट फलप्राप्ती यामुळेच घडते असे त्याचे माहात्म्य शास्त्र सांगतात. प्रखर प्रतिभेचा स्रोत म्हणजे 'ईश्वर' होय. त्यालाच दुसऱ्या शब्दात ''सत्प्रवृत्तींचा समुच्चय'' असेही नाव देतात. ईश्वर हा मानवी जीवनात गौरवास्पद आदर्शवाद आणि उत्कृष्टता या दोन रूपांनी प्रकट होत असतो. ही आंतरिक श्रेष्ठता प्राप्त करून घेणे आणि तिचे सतत संवर्धन करीत राहणे-हाच पूजा-उपासनेचा मुख्य हेतू होय.

यंत्रांत विजेचा प्रवाह कमी प्रमाणात पोहचत असेल तर यंत्रांची गती मंद प्रमाणात चालते; पण विजेचा प्रवाह जोरात वाहू लागला की त्याच यंत्रांत गती व शक्ती वाढते. चेतनेचा तात्पुरता अंश प्रत्येक प्राण्यात असतो. त्यामुळे तो आपली दिनचर्या कशी-

बशी चालवू शकतो. ही गोष्ट निसर्गसिद्ध व जन्मजात आहे. परंतु जेव्हा चेतनेची अधिक प्रमाणात गरज भासते तेव्हा ती योग आणि तप साधनेद्वारा प्राप्त करता येते. याचेच दुसरे नाव आहे प्रतिभा आणि सेवा-साधना. त्यामुळेच योग व तप यांची सुलभपणे प्राप्ती होऊ शकते.

अष्टांग योगाच्या तत्त्वज्ञानात सर्वप्रथम यम-नियमांची गणना केली आहे. अंतरंग आणि बहिरंग शिस्तीची ही दोन रूपे आहेत. या दोन अंगांनी जो जितकी उन्नती करून घेईल, तितकीच त्याने आत्मोन्नती साध्य केली असे समजावे. त्याची गणना महामानवात होऊ लागते आणि त्याला त्या स्तराच्या ऋद्धि-सिद्धी प्राप्त होतात. व्यक्तीतील पशुवृत्ती हळूहळू कमी होऊन, त्याच्यात दैवी संपत्तीचा अधिकाधिक विकास व्हावा, हाच उपासनात्मक कर्मकांडाचा अंतर्गत हेतू आहे. या उद्दिष्टाचे जर विस्मरण झाले आणि पूजा-पाठाचे क्रियाकृत्यच केले गेले, तर तो केवळ निर्जीव उपक्रम ठरेल आणि तेवढे करून मोठी फलश्रुती प्राप्त करण्याची आशा बाळगणाऱ्यांच्या पदरी निराशाच पडेल.

समर्थ पक्ष्यांच्या नेतृत्वात लहान लहान अनेक चिमण्या उड्डाण घेतात. बलवान हरिणाच्या परिवारात त्याच्या जातीच्या अनेक हरिणी सामील होतात. मुंग्या रांगेने चालतात. बलवान आत्मिक शक्तीच्या प्राप्तीनंतर दैवीशक्तीचे अवतरण प्रारंभ होते. साधक हळूहळू अधिक उच्च दर्जाचा सिद्ध बनत जातो. हीच सर्वात मोठी फलश्रुती होय. त्यातून महान ध्येय प्राप्त करता येतात. गौरवास्पद कार्य हातून पार पडतात. सामान्य जनांना ती कामे पूर्वी अशक्य वाटायची. त्यामुळे ते अशा घटनांना चमत्काराचे नाव देतात.

या स्थितीच्या प्राप्तीसाठी दोन आघाड्यांवर लढावे लागते- एक म्हणजे आपल्या गुण-कर्म-स्वभावातील दोष, दुर्गुण व कुसंस्कार दूर करीत जाणे, कारण त्यांच्यामुळे साधकाची अर्धी शक्ती वाया जात असते. आपल्या व्यक्तिमत्त्वातील छिद्रांमधून शक्ती वाहून जाते. ज्याला स्वतःच्या समस्याच सोडविता येत नाहीत, तो व्यापक क्षेत्रात कोणते महत्त्वाचे कार्य संपादन करू शकेल? उपाशी मनुष्य कोणतेच काम धड करू शकत नाही. तद्वतच दुर्गुणी मनुष्य स्वतःसाठी इतक्या समस्या व संकटे ओढवून घेतो की त्याची बहुतांश शक्ती त्यातच खपून जाते. मग त्याच्याजवळ इतर व्यापक प्रश्न सोडविण्यासाठी कोणतेच सामर्थ्य शिल्लक राहू शकत नाही.

लहान बालकांना अंगाई गीते गाऊन झोपवितात. ती पाळण्यात हलत डोलत झोके घेत लवकर झोपून जातात. रडणाऱ्या मुलांना अफू चाटवून झोपवितात. त्या गुंगीत ते झोपून जातात. याप्रमाणेच मनुष्य सुद्धा कुसंगती व दुर्व्यसनांच्या मादकतेने आळशी व प्रमादी बनतो. तो एक प्रकारे अर्धमृत व अर्ध-विक्षिप्त स्थितीत राहू लागतो. विवेकशक्ती गमावून बसल्याने तो चुकांवर चुका करीत जातो. कुमार्गावर आरूढ होतो.

अशी माणसे त्यांना उपलब्ध असलेल्या चांगल्या गोष्टींचा दुरुपयोगच करतात. तथापि ज्यांनी या मार्गाने जाण्याचे दुष्परिणाम समजून घेतले, त्यांच्यासाठी स्व-अनुशासन कठीण नसते. मार्गात येणाऱ्या अडथळ्यांना ते फार महत्त्व देत नाहीत. अशी संकटे त्यांना हलकी-फुलकी वाटतात. कुमार्गावर चालणाऱ्यांना मात्र तीच फार प्रचंड जाणवतात. पारमार्थिक सेवा-कार्यात ते जो वेळ आणि साधने खर्च करतात, त्यात त्यांचा फारसा तोटा होत नाही. स्वार्थी

व संकुचित बनून तात्कालिक लाभावर लक्ष देणाऱ्यांना मात्र अधिक नुकसान सोसावे लागते.. मोहमूढ अवस्थेत त्यांना सतत पतन पराभवास तोंड द्यावे लागले.

महत्त्वाचे कार्य पूर्ण करण्यासाठी प्रतिभा-संपन्न व्यक्तिमत्त्वच हवे असते. कारण बेसावध व अडाणी माणसे जेवढे काही चांगले करतात, त्यापेक्षा ते वाईटच जास्त करतात व त्याचे दुष्परिणाम भोगतात. अशा व्यक्तींची कोठेच आवश्यकता भासत नसते. त्यांचा उपयोगही होत नसतो आणि त्यांना प्रतिष्ठा सुद्धा मिळत नाही. त्यांना पदोपदी ठेचा खाव्या लागतात. या उलट जागृत विवेकी पुरुषांचा पुरुषार्थ असतो. ते अंतःकरणपूर्वक आपले कार्य म्हणजे आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनवितात. अशांनाच जगात थोरवी प्राप्त होते. अवघड आणि महत्त्वाची कामे असे लोकच पार पाडत असतात. मोठेपण आणि प्रतिष्ठा त्यांनाच लाभते. साधने तर केवळ पोषक ठरतात. खरोखर, मनुष्याची क्षमता आणि दक्षता या त्याच्या गुण-कर्म-स्वभावाच्या तेजस्वीपणावर अवलंबून असतात.

अध्यात्म म्हणजे जादूची कांडी नव्हे किंवा आकाशातून पडणारे वरदान-अनुदानही नव्हे. खोटी स्तुती-स्तोत्रे गाणाऱ्यांना मालामाल करून देणे हा काही देवी-देवतांचा धंदा नव्हे. आपली भक्ती न करणाऱ्यांवर क्रुद्ध होऊन त्यांचे अकल्याण करणे हाही देवी-देवतांचा स्वभाव नसतो. वास्तविक पाहता देवत्व म्हणजे आत्मजागरणाची एक विशिष्ट अवस्था होय. त्यात साधक-भक्त आपलेच प्रसुप्त वर्चस प्रयत्नपूर्वक जागृत करून सक्रिय करीत असतो. आपल्याच शुभ कर्मांचा जास्तीत जास्त लाभ घेत असतो.

भगवान विष्णू शेषशैय्येवर झोपलेले असतात, असे सांगतात. कुसंस्कार संपन्न लोकांच्या भगवंताचे हे वर्णन असावे. कारण आपल्या बालिश व संस्कारशून्य भक्तांच्या गडबड गोंधळाला कंटाळून भगवंत डोळे मिटून झोपत असावा व आपला जीव वाचवत असावा. तथापि जी मनस्वी माणसे त्याच्या कृपेने संकटांशी लढू पाहतात, त्यांच्यासाठी तर भगवंत द्रौपदी व गजेन्द्रा समान त्यांचे संकट हरण करण्यासाठी धावत येतो. ज्यांना वर्चस प्राप्त करणे आहे, त्यांना भगवंत सुदामा, नरसी मेहता, बिभीषण व सुग्रीवा समान न मागताच प्रचुर वैभव देत असतो.

इच्छा शक्तीच जगातील सर्वात मोठे सामर्थ्य होय. साहसयुक्त संकल्पापेक्षा या जगात जास्त बळवान काहीही नाही. हेच संकल्प बळ जागृत करून वाढवित जाणे हे जीवनाचे खरे ध्येय होय. कारण स्वर्ग-मुक्ती समान आध्यात्मिक लाभ आणि ऋद्धि-सिद्धी समान भौतिक लाभ या प्रचंड संकल्पशक्तीच्या बळावरच प्राप्त होऊ शकतात.

आपले ओझे आपणच उचलणे सुद्धा कठीण वाटते, मग इतर अगणित जनांचे ओझे आपण वाहणे आणि त्यांना प्रगतिपथावर पुढे पुढे नेत राहणे हे किती अवघड वाटावे, पण हे कठीणपण वा असमर्थता असे पर्यंतच भासते. आपल्या जवळ सामर्थ्य प्रचंड प्रमाणावर संचित असेल तर आपली स्थिती रेल्वे क्रेन सारखी होते. रेल्वेच्या रुळावरून घसरलेले डबे आपल्या आकड्यात अडकवून ती क्रेन त्यांना उलट्याचे सुलटे करून यथायोग्य स्थानी उचलून ठेवते.

एकविसाव्या शतकात यापेक्षा फार प्रचंड पुरुषार्थ करावा लागणार आहे. गेल्या दोन महायुद्धांनी निर्माण केलेली संकटे निरस्त करायची आहेत. उदाहरणार्थ- वायू प्रदूषण, विषमता आणि दुराचरणांनी निर्माण केलेली विविध संकटे दूर करावयाची आहेत. या सर्वांसाठी शक्तीचा खर्च झाला आहे. पण विध्वंसापेक्षा सृजनासाठी अधिक सामर्थ्य व साधने हवी असतात. योग्य वेळेवर या साधनांचा संचय झाला नाही, पुरेशी साधने आपण जर जमवू शकलो नाही, तर दुष्ट विचार आणि भ्रष्ट आचार यांनी निर्माण केलेल्या अगणित समस्यांचे आपण निराकरण करू शकणार नाही. या काळात प्रत्येक व्यक्ती ही संकटांनी व समस्यांनी जर्जर, प्रक्षुब्ध व उद्विग्न बनली आहे.

## प्रतिभावंतच युग परिवर्तन करतील

कार्य विशाल असले तरी त्याचे उपाय सोपे सरळ आहेत. प्रतिभावंतांना जर विकसित केले, मोठ्या प्रमाणावर त्यांचा सर्वत्र आविर्भाव होऊ लागला, तर त्यांच्या कर्तृत्वाने हे विश्वव्यापी कार्य सहज साध्य होऊ शकेल. सामाजिक आणि स्थानिक समस्यांचे निराकरण अधिक सोपे होईल.

प्रत्येक महान कार्यासाठी तदनुरूप मोठी शक्ती हवी असते. शक्तीशिवाय लहान-सहान कामे सुद्धा पूर्ण होऊ शकत नसतात. प्रत्येक महत्त्वाच्या कार्यासाठी ऊर्जा हवी. तर मग युग निर्माणासारख्या वैश्विक अतिशय अवघड कार्यासाठी ज्येष्ठ

प्रतिभासंपन्न व्यक्तींनी खांद्यास खांदा लावून कार्य केल्याशिवाय ते कसे पूर्णत्वास जाणार? याची कल्पना सुद्धा करता येत नाही.

नवयुग निर्माणाची विश्वव्यापी रचना ज्याने कल्पिली आहे, या पुण्य प्रयोजनासाठी प्राणवान व जिद्दीच्या व्यक्तींची मोठी थोरली सेना उभी करण्याची गरज ज्यास भासली आहे, त्याने हा सारा सरंजाम वेळेआधीच जुळविण्याची पूर्व तयारी सुद्धा करून ठेवली आहे. हे निवेदन त्यांच्यासाठीच आहे. प्रतिभा विकासाचा सुयोग जर विपुल प्रमाणात साध्य झाला, तर मग आपल्या या जगाचे स्वरूप व परिवेश-वातावरण आमूलाग्र बदलून टाकण्याच्या कार्यात विश्वाचा नियंता असणाऱ्या भगवंतापाशी दुसरी कोणतीच अडचण राहणार नाही.

भूतकाळात सुद्धा मनस्वी जनांनी एकाहून एक आश्चर्यजनक कामे संपन्न केली आहेत. त्यात अगस्ती मुनींचे समुद्रप्राशन, हनुमंताने पर्वत उपटून तळहातावर आणणे, विश्वामित्रांच्या तात्विक मार्गदर्शनाने रामराज्याची स्थापना होणे या घटना हेच दर्शवितात की "करू वा मरू" अशा निश्चयाचे महामेरू समान लोक अशक्य गोष्टी सुद्धा शक्य करून दाखवितात. स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणणाऱ्या भगीरथाला यश लाभले होते. तर मग नवनिर्माण कार्यात संलग्न असणारी भगीरथांसारखी मंडळी स्वार्थाच्या भ्रमजाळातून बाहेर पडून हे सरळ-सोपे कार्य संपन्न करण्यास का समर्थ होणार नाहीत?

प्रतिभेचे तेजस्वी स्वरूप इतर कोणाच्याही कृपा-औदार्यावर अवलंबून नाही. ते पूर्णपणे आपल्याच स्वाधीन आहे. शरीराकडून

इच्छेनुरूप कार्य करून घेता येते. त्यावर आपले पूर्ण नियंत्रण असते. जे लोक जगाच्या आजच्या प्रथा-परंपरांनाच सर्व काही मानतात, त्यांना काय म्हणावे? आपले मनोबळ आणि प्रयत्न यांना योग्य दिशा दिली तर प्रत्येक व्यक्ती अंतःकरणाच्या प्रेरणेनुसार अगदी अशक्य वाटणारे कार्य सुद्धा घडवून आणू शकते. हा नवीन प्रयोग नाही. भूतकाळात असे प्रयोग झाले आहेत, होत असत. अनेक युग बदलत गेले आणि मनुष्यानेही आपल्या प्रथापरंपरा, आचार-विचारात आमूलाग्र बदल घडविले. या वेळी सुद्धा महाकाळाने दिलेले आव्हान नाकारता येणार नाही.

गांधीजी, बुद्ध, येशू यांची धार्मिक आंदोलने यशस्वी करण्यामागे भगवंताचाच संकल्प कार्य करीत होता. या काळातही प्रतिभावंतांना गोळा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. योग्य वेळेवर ते कार्य पूर्ण होईल. त्यात काही न्यूनता राहणार नाही. कारण प्रतिभावंत जेव्हा दैवी हुंकार देऊन जागे होतात, तेव्हा ते विशिष्ट दर्जाची प्रतिभा जागृत करतात. हेच प्रतिभावंतांचे वैशिष्ट्य म्हणावे. शरीरबळ, साधनबळ, बुद्धिबळ यांची इतकी आवश्यकता नाही, जितकी गांधी, बुद्ध, विनोबांसारख्या प्रतिभावंतांची गरज आहे. वेळ कमी असला तरी आपल्या संपर्क क्षेत्रात प्रतिभा-संपन्न लोक इतर सामान्य जनांना जागृत करू शकतात आणि गिधाड, खार, शबरी, भिल्ल, यांच्या सारखे चमत्कार निर्माण करू शकतात. सामान्य व लहान मानले गेलेले लोकही मोठे कार्य करू शकतात.

एकविसाव्या शतकाच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन श्रीमंत वर्गाला सुद्धा केले आहे. प्रारंभी अगदी लहान

कार्य सोपवले आहे. युगसंधी महापुरश्चरणात जप, साधना, समयदान, अंशदान, साप्ताहिक सत्संग, झोला पुस्तकालय इत्यादी स्काऊट व्यायामासारखे सोपे व्यायाम त्यांना म्हणता येईल- त्यातून त्यांची अभिरुची व श्रद्धा वाढू शकते.

# कुरूपता दूर होऊन सौंदर्य विकसित व्हावे

पृथ्वीचा उत्तर ध्रुव हा अखिल ब्रह्मांडात व्यापलेल्या पदार्थ-संपदेतून आपणांस आवश्यक तेवढे तत्त्व आपल्याकडे खेचत असतो. तेच पृथ्वीची विविध प्रकारची गरज पूर्ण करीत असते. निरुपयोगी अंशाचा निचरा ध्रुव मार्गाने कचऱ्यासमान बाहेर फेकून दिला जातो. मनुष्य शरीरातही अशीच क्रिया सुरू असते. तो आपली आवड, स्वभाव व प्रकृतीस अनुसरून आकाशातून चेतन तत्त्व खेचतो आणि सोडत असतो. त्याच भांडवलावर आपले काम भागवतो. काय ग्रहण करायचे आणि काय सोडायचे हे माणसाच्या मानसिक चुंबकत्वावर अवलंबून असते. आपले मन उच्च कोटीचे झाले असेल तर त्याचे आकर्षण विश्वब्रह्मांडातून आपल्या समान पातळीचे सहयोगी तत्त्वें खेंचत राहील व आपले भांडार समृद्ध करत राहील. मात्र आपले भांडवल आपल्या मनोबळानुसारच जमा होत राहील. मानवास जन्मतःच विभूतींचे प्रचंड भांडार प्राप्त झाले आहे. तथापि ते सुप्तावस्थेत तिजोरीत बंद असते. त्याचा हेतू असा की मनुष्याने गरजेनुसारच त्याला प्रयत्नपूर्वक बाहेर काढून उपयोगात आणावे. भूगर्भात विविध प्रकारचे रासायनिक पदार्थ विपुल आहेत, हे सर्वश्रुत आहे. तसेच हे ही सर्वांना माहीत आहे

की आकाशातून पृथ्वीवर सतत प्राण तत्त्वाचा वर्षाव होत असतो. वनस्पती सृष्टी आणि प्राणीसृष्टीचे जीवन याच उभयपक्षीय अनुदानांवरच टिकून असते.

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाबावत सुद्धा असेच म्हणता येईल. तो आपल्या उन्नतीसाठी आपल्या वर्चसचा केवढा महत्त्वाचा अंश खेचू शकतो आणि आपल्या सामर्थ्याने इच्छित कार्यात लावू शकतो, हे त्याच्यावर अवलंबून आहे. सुपीकता जमिनीतच असते, पण ती प्रगट होण्यासाठी वरून पाण्याचा वर्षाव होणे आवश्यक ठरते. अन्यथा सुपीकपणा हिरवळीचे सौंदर्य धारण करू शकणार नाही. माणसाने आपल्या अंतःकरणातील सुप्त विभूती वैशिष्ट्यांना ऊर्ध्वगामी केले पाहिजे. त्याच बरोबर अदृश्य सृष्टीतून विपुल ऐश्वर्याचा अंश सुद्धा आपल्या आकर्षण शक्तीच्या बळावर खेचून आपणास अधिकाधिक समृद्ध नि संपन्न केले पाहिजे.

आपले गुण-कर्म-स्वभाव यांना प्रखर व तेजस्वी बनवावे आणि त्याच बरोबर ईश्वराशी संबंध प्रस्थापित करून व्यापक शक्तीसाठी उपयोगी तत्त्वे खेचीत राहावे. या दोन्ही क्रिया नियमितपणे आपापल्या पद्धतीने सुरू झाल्या तर प्रगतीचा सुव्यवस्थित मार्ग सापडला आहे, असे म्हणता येईल. हे तथ्य लक्षात घेऊनच चिंतन, चारित्र्य व स्वभावास-गुण, कर्म, भावसंवेदनांना उत्तरोत्तर अधिक उत्कृष्ट व उदात्त करण्याच्या प्रयत्नांवर भर दिला जात असतो. तसेच या विराट विश्वाच्या कामधेनूची अनुकूलता प्राप्त करून तिचे अमृतरूप पयःपान करीत राहवे, हे ही आवश्यक ठरते.

प्राण आपला आहे. प्रतिभा सुद्धा आपलीच आहे. तथापि ते कुरूप व बेडौल रूपात सुप्त स्थितीत काटेरी झुडपांनी भरलेले

आहेत. त्यातून रमणीय उद्यान निर्माण करण्यासाठी कुशल माळी हवा आणि सावधपणे केलेले प्रयत्न हवेत. जे याचा अनुभव घेतात त्यांना 'ईश्वर अंश जीव अविनाशी' हे संताचे वचन सोळा आणे सत्य असल्याचे पटते. त्यात काहीच अतिशयोक्ती नाही. नुकसान तर त्यांचे होते, जे आपले स्वतःचेच अहित करीत असतात. आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासमान हे आहे. जो स्वतःच आपला अपमान व उपेक्षा करतो, तो इतरांकडूनही तिरस्कृत होतो. स्वतःचे नुकसान करून घेतो.

# विराट कार्यासाठी प्रतिभावंतांची गरज

एकविसाव्या शतकात प्रत्येकाने आपापल्या भावनेस व योग्यतेस अनुसरून काही ना काही कार्य करावेच. व्यस्तता नि अभावग्रस्तता यामुळे काय करावे हे समजत नसेल, तर आपली मनःस्थिती आणि परिस्थितीची माहिती कळवून शांतिकुंज, हरिद्वारहून परामर्श घ्यावा.

या शतकात प्रखर प्रतिभावंतांची मोठ्या प्रमाणात गरज पडणार आहे. गेल्या शतकात प्रदूषण खूप वाढले, परस्पर द्वेष-दुर्भावना वाढली आणि दुष्ट प्रथा-परंपरा वाढल्या आहेत. त्यात सामान्यजनांचा दोष कमी असून प्रतिभावंतांनी निर्माण केलेला अनर्थच मोठ्या प्रमाणात आहे. आता सफाईची वेळ आली आहे, ज्यांनी घाण, कचरा निर्माण केला त्यांनीच स्वच्छता करून प्रायश्चित्त घ्यावे. बांधकाम तोडणारे मजूर स्वस्त दरात मिळतात. तथापि कलात्मक भवन निर्माण करण्यासाठी कुशल कारागीरच हवे

असतात. नवनिर्माण कार्यात, संलग्न होणारे प्रतिभावंत अधिक कुशल, दूरदर्शी व तत्पर असावेत. त्यांचे अंतःकरण सुद्धा उज्ज्वल भाव-संवेदनांनी तुडुंब भरलेले हवे. तसेच बाह्य दृष्टीने त्यांच्याजवळ भरपूर वेळ व साधने सुद्धा असावीत. तरच या कार्यास विलंब होणार नाही. नवयुगाची क्षतिपूर्ती ते विश्वकर्म्याच्या तत्परतेने करू शकणारे हवेत. त्यांनी एकांगी बनू नये, तर आजच्या गरजा सर्वांशाने पूर्ण करण्याचे भान त्यांच्यापाशी असावे. त्यांच्या ठायी दक्षता प्रकट व्हावी. हेच नवनिर्माण आजची सर्वात मोठी आवश्यकता हीच आहे. सृजेताच हे कार्य पूर्ण करून दाखवितो. मूकदर्शक तर नुसता साक्षी बनून पाहत राहतो. अशा गर्दीत अव्यवस्थाच वाढते. घाण व गोंधळ पसरविणे हेच तर मूर्ख व बेशिस्त लोकांचे काम असते.

परमेश्वराची सृजन-प्रेरणा कोणत्या वेगाने सुरू आहे आणि उज्ज्वल भविष्य आता किती निकट आले आहे, याचा पडताळा घेणारा एकच उपाय आहे. तो म्हणजे किती लोकांच्या अंतःकरणात या कसोटीच्या प्रसंगी असामान्य कौशल्य प्रकट करण्याचा उत्साह उसळतो आहे? स्वार्थापेक्षा परमार्थास महत्त्व देण्याची भावना किती दृढ झाली आहे? नव सृजन ही आजच्या काळाची सर्वात महत्त्वाची गरज आहे. या बाबतीत कोणीही काही विचार करू शकतो; पण ते विचार आचरणात आणायची किती लोकांची तत्परता आहे? कोण आपल्या व्यक्तिगत गरजा कमी करून जास्तीत जास्त वेळ, परिश्रम, मनोयोग आणि साधने नवनिर्माणाच्या कार्यात लावू शकतो? या कसोटीवर प्रत्येकाने आपणास कसून पाहावे. इमारत

बांधायची तर विटा, चुना, सिमेंट, लाकूड-फाटा, लोखंड इत्यादी साधने अपरिहार्य ठरतात. युग सृजनाच्या कार्यातही साधनांची विपुल प्रमाणात गरज आहे. ती वाढविण्यासाठी प्रथम अनुदान स्वतःपासून सुरु करावे. आपले स्वतःचे अनुकरणीय उदाहरण लोकांसमोर ठेवावे. तरच इतरजन त्याचे अनुकरण करण्याचे धाडस करतील, समर्थन व सहकार्याचा उत्साह दाखवतील.

वर म्हटलेच आहे की युग सृजनाच्या या कार्यात भगवंताच्या उच्च कोटीच्या सृजन शक्तीची महत्त्वाची व मुख्य भूमिका राहील. मनुष्याचा सामान्य स्वभाव असा की तो घडवितो कमी आणि बिघडवतो जास्त. पण जेथे नवनिर्माणच मुख्य लक्ष्य आहे, तेथे तर भगवंताची सृजन सेनाच आघाडीचा मोर्चा सांभाळू शकेल. प्रत्येक सैनिकापाशी आपापल्या परीने एक शस्त्र-अस्त्र असते. युग सृजनाच्या आदर्शाबाबत इतकी दृढ श्रद्धा आणि ध्यास हवा की कोणत्याच आकर्षणाने तो विचलित होणार नाही. अशा व्यक्तींनाच 'देवमानव' म्हटले जाते. एवढे विराट कार्य करण्याची आशा व अपेक्षा त्यांच्याकडूनच करता येते. ज्या तथाकथित कुंठाग्रस्त व मायाग्रस्त जनांना हे विचार ऐकण्याची व त्यावर विचारचिंतन करण्यासही वेळ नाही, त्यांच्याकडून काहीही कार्य होऊ शकत नाही.

ईश्वराचे खरे स्वरूप न समजणारे लोक, त्याला मनोवांछित कामनांची पूर्णता करणारे माध्यम मानतात. त्यांचा तथाकथित ईश्वर हा भक्ताची पात्रता न पाहताच डोळे मिटून ज्याला जे हवे ते देत सुटतो. मग त्याची मागणी योग्य की अयोग्य याचा विचार तो

करीत नाही. ईश्वराविषयी ही धारणा अज्ञानजन्य आहे. तथापि ज्यांना ब्रह्मसत्तेचे खरे ज्ञान आहे, ते आत्मशुद्धी व लोककल्याणाच्या कार्याला महत्त्व देणारेच खरे ईश्वर-भक्त ठरतात. त्यांना याचा मोबदला अनुग्रह रुपात "सजल श्रद्धा व प्रखर प्रज्ञा" अनुदान म्हणून लाभत असतात. त्यामुळेच ते ईश्वरी पुण्य-प्रयोजन कार्य करण्यात निमग्न होतात. त्या शिवाय त्यांना चैनच पडत नाही. अती उत्कट लालसा जागृत झाल्यामुळे वासना, तृष्णा व अहंकाराची मोहनिद्रा त्यांच्या जवळपास सुद्धा जाऊ शकत नाही. गेलीच तर अपयशी बनून माघारी येते. अशा व्यक्तींनाच नररत्ने म्हणतात. अशीच माणसे प्रेरणाप्रद इतिहास निर्माण करतात. त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून सामान्य माणसे सुद्धा सर्वोच्च ध्येयापर्यंत पोहचू शकतात. लहान-मोठ्या रुपात ही स्थिती निर्माण झाली तर अनुमान करावे की भावनात्मक परिवर्तन आता लवकर येणारच आहे. कोंब निर्माण झाले तर फुलांच्या कळ्या निर्माण झाल्या असे आपण अनुमान लावतो. नंतर फुले उमलतील, वातावरणात सुगंध व सौंदर्य पसरणारच यात शंका राहत नाही. वृक्ष,लता फुला-फळांनी बहरतील व सर्वांना आनंद देतील, यात शंका राहत नाही.

आजच्या काळात सर्वसामान्य बहुतेक माणसे संकुचित स्वार्थातच पायापासून तो डोक्यापावेतो बुडाली आहेत. सभोवताली पसरलेल्या पतन-पराभवाचे दृश्य पाहून त्यांच्या डोळ्यांत अश्रूचा एक टिपूस सुद्धा तरळत नाही. या अनिष्ट स्थितीला भाग्यदायक सुस्थितीत बदलून टाकण्यासाठी आपण काय करू शकतो, याचा विचारही त्यांच्या कठोर व बधीर बनलेल्या मनात स्फुरत नाही.

त्यांच्या कानापर्यंत हीन-दीन जनांच्या आर्त किंकाळ्या जात नाहीत. नर्तकीच्या घुंघरांचा छमछम आवाजच तेवढा ज्यांना ऐकू येतो, त्यांना काळाची हाक आणि ईश्वरी दिव्य वाणी कशी ऐकू येणार? मानवी भाव-संवेदना जेथून पलायन करून गेल्या आहेत, जेथे स्मशाना सारखी नीरवता नांदते आहे, तेथे सुसंस्कार व शालीनतेचा स्नेह-सद्‌भाव कसा निर्माण होणार? त्या दिशेने त्यांची पावले कशी पडणार? अशा विपरीत वातावरणात कोणाच्या मनात काही पुण्य-परमार्थ करण्याची इच्छा उद्‌भवली तर समजावे की याच घनदाट अंधाराच्या आकाशात नक्षत्रांचा प्रकाश उदयाला येत आहे. रात्रीच्या आकाशास रत्नजडित चांदण्यांनी सुशोभित करणाऱ्या मंगलमयी उषादेवीचे शुभागमन सुरु झाले आहे. कवीजनांनी म्हटलेच आहे-

**"घनतमी शुक्र बघ राज्य करी,**
**रे खिन्न मना, बघ जरा तरी."**

"रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल." आदर्शांबाबत श्रद्धा आणि कर्तव्याबाबतचा ध्यास जेथे उदय पावत्तांना दिसत असेल तर समजावे तेथे देव-मानवाचा अवतार होऊ लागला आहे. मोठी माणसेच मोठी कामे करू शकतात. हत्तीचे ओझे हत्तीच पेलू शकतो. हत्तीचे ओझे जर गाढवाच्या पाठीवर लादले तर बिचाऱ्याचे कंबरडेच मोडून जाईल. क्षुद्र किडे-माकोडे आपले अस्तित्व मर्यादित वर्तुळातच ठेवतात व त्यातच आपली सारी शक्ती संपवून टाकतात. आदर्शांचा विचार व आचरण त्यांच्या मनातही येऊ शकत नाही. विश्वकल्याणाच्या पुण्य-परमार्थात आवडीने काही कार्य करून भगवंताच्या युग निर्माण कार्यास हातभार लावावा ही आकांक्षा

सुद्धा त्यांच्या बधीर मनास स्पर्श करु शकत नाही.

पावसाळा आला की सर्वत्र 'हिरवे हिरवेगार गालीचे। हरित तृणांच्या मखमलीचे॥' पसरलेले दिसतात. ऋतुराज वसंताचे आगमन होताच वृक्ष-वेली रंगी-बेरंगी फुलांनी बहरतात. तद्वत् समजावे की नवयुग सृजनाच्या या पुण्यप्रसंगी किंचित्ही उष्णता मिळताच दुधावर साय तरंगू लागेल. नवयुग हा चमत्कार घडवील. अरुणोदय झाला म्हणजे लोक आपापल्या कामास लागतात. तद्वतच या काळात लोकांचा दृष्टिकोन बदलून जाईल. आपला जीवन-निर्वाह स्वल्प साधनांनी करून जास्तीत जास्त अंश युग परिवर्तनाच्या बहुमुखी कार्यास समर्पित करतील. हे कार्य इतक्या तत्परतेने व श्रद्धेने ते करतील, जणू या कार्यासाठीच त्यांनी अवतार धारण केला असावा. झऱ्याचा जलप्रवाह जमीन फोडून वर उफाळतो, तसेच हे काहीसे म्हणता येईल.

काळ आपल्या गतीने चालतो, बदलत असतो. तथापि कुठे जर आकस्मिक परिवर्तन होतांना दिसले तर समजावे की ते संध्या समयीचे परिवर्तन पर्व आहे. परिवर्तनाचे पर्व निकट आहे. त्यात खूप मोठी परिवर्तने घडणार आहेत. तथापि परिवर्तनाची प्रथम किरणे जेथे दृष्टीस पडतील, तेथे ती प्रतिभावंतांच्या अभिनव रूपातच आढळतील. भगवंत मनुष्यांच्या रूपात अवतार घेईल. त्यांचे वैयक्तिक आचार-विचारांच्या परिवर्तनातूनच विश्वपरिवर्तनाचे कार्य सुरु होऊन उत्तरोत्तर ते व्यापक बनत जाईल.

योजना, प्रेरणा, दक्षता, व्यवस्था व शक्ती-सामर्थ्य तर भगवंताचेच असेल. तथापि युगानुकूल सेवा-संकल्प, श्रद्धा, विश्वास,

ध्यास ज्याच्या अंतःकरणात स्फुरण पावतील, त्यांच्याच पदरी श्रेय पडेल. कोंबडा स्वतः जागा होतो व त्याची सूचना इतरांना देतो; त्याचे आरवणे ऐकून अगणित जनांना ब्रह्ममुहूर्ताची सूचना मिळते. ते सुद्धा अरुणोदयाचा लाभ घेण्यासाठी आपापल्या कर्मक्षेत्रात पावले टाकतात. आगामी काळात असेच काहीसे घडणार आहे.

## सद्बुद्धीचा महापूर कसा येईल?

अभाव आणि संकटांमुळे कित्येक माणसे सतत चिंतातूर व अस्वस्थ बनून जीवन कसे बसे रेटतात. इतर सुखी-समृद्ध जनांकडून ते मदतीची आशा करीत असतात. तशी मदत करणारा कर्तव्य पालनाचे व पुण्य-परमार्थ केल्याचे समाधान अनुभवत असतो.

दुर्बलता, रोगराई, गरिबी, शत्रूंचा त्रास, मूर्खपणा आणि भय अशा अनेक कारणांनी माणसाची दुःखे वाढतात. ते कष्टी होतात. या सर्व कारणांच्या मुळाशी एकमेव कारण महत्त्वाचे आहे. ते म्हणजे- दूरदृष्टीचा अभाव. त्यालाच अविचारीपणा सुद्धा म्हणतात. दिग्भ्रांत मनुष्य समंजस व बुद्धिमान असूनही या दुष्ट रिंगणात सापडून व पथभ्रष्ट बनून पावलो पावली ठेचा खात असतो. दुराचरण सुद्धा यातूनच घडत असते. गुण-कर्म-स्वभावात क्षुद्रपणा याच कारणाने शिरकाव करीत असतो. मुळातून अनेक फांद्या व पाने फुटावी, तद्वत एका अविवेकीपणामुळे सकारण वा अकारण अशा अनेक समस्यांमध्ये मनुष्य गुरफटत जातो आणि संकटे ओढवून घेत असतो.

झाडाच्या पानांवर पाणी शिंपडण्याने वृक्ष वाढत नसतात. त्यासाठी मुळांना पाणी घालावे लागते. तसेच इतर प्राण्यांपासून त्यांचे रक्षण करावे लागते. इतकी व्यवस्था केली नाही तर सुपीक जमीन, उत्कृष्ट बिया असूनही ते फळा-फुलांनी बहरू शकत नाही.

सद्ज्ञान हे सर्व संकटांचे निवारक आहे, असे मानले जाते. रामायणाचा सिद्धांत आहे-'जहाँ सुमति वहाँ संपत्ति नाना' अर्थात जेथे विवेकशीलता असेल तेथे अनेक सुख-सुविधा आपोआप आकर्षित होऊ लागतात. यासाठीच सद्बुद्धीची अधिष्ठात्री गायत्री देवी ही मानली-गेली आहे. मनःस्थिती परिस्थितीस जन्म देत असते आणि परिस्थितीच सुख-दुःख, उत्थान-पतनाचे विभिन्न कारण बनून प्रगट होत असते. गीताकारांनी योग्यच म्हटले आहे की मनुष्य स्वतःच आपला शत्रू आहे आणि त्याची इच्छा असेल तर तो स्वतःच आपला घनिष्ठ सहयोगी मित्र बनू शकतो. म्हणून आपण स्वतःला पतनाकडे न नेता उत्थानाकडे नेत राहिले पाहिजे.

आशा आणि विश्वासाच्या बळावर असाध्य रोगाने ग्रस्त बनलेले रोगी आपल्या आजारपणाशी लढून काही काळानंतर निरोगी व धष्टपुष्ट बनतात. उलट शंकेखोर भित्रे आणि अशुभाचे चिंतन करणारे सामान्य रोगी सुद्धा पराचा कावळा करून मृत्यूच्या मुखात बळजबरीने प्रवेश करतात. अशुभ चिंतनाचे अभ्यस्त लोक आपली जिद्द व धैर्य हे या घातक सवयीमुळे मोठ्या प्रमाणावर गमावून बसतात. अडचणी आणि संकटे तर प्रत्येकाच्या जीवनात येतच असतात. पण त्यांना सर्वप्रकारे धैर्याने व हिंमतीने पराभूत करता येते. सहनशीलपणा हा असा एक सद्गुण आहे त्याचेशी धैर्य नि

साहस हे गुण सुद्धा संबद्ध असतात. जन्मठेपेची शिक्षा झालेले कैदी सुद्धा ते संकट विसरून घराप्रमाणे तुरुंगातही जीवन जगतात आणि शिक्षा भोगून घरी परत येतात. सुनसान, निर्जन अरण्यात, शेतात किंवा बागेत राखण करणारे रखवालदार निर्भयपणे पहारा देतात, याच्या उलट भित्र्या लोकांना उंदरांची खुडखुड सुद्धा भूतपिशाच्या सारखी भीतिप्रद वाटते. घरात राहूनही ते भयभीत होऊन वावरतात. शत्रू प्रत्यक्षपणे तितके नुकसान करीत नसतात, जितकी त्यांच्या विषयी केवळ कल्पनेने हानी होते. काही लोक गरिबीत सुद्धा हसत-खेळत जीवन जगतात. याच्या उलट कित्येकांजवळ विपुल धन असून सुद्धा त्यांना तृष्णा राक्षसीण सतत खात असते. हा सारा मनाचा खेळ आहे. प्रत्येकाची स्वतःची एक मानसिक सृष्टी असते. ती त्याच्या मनाने निर्माण केलेली असते. परिस्थिती आणि सहकारी इष्ट-मित्रांचा त्यात नगण्य सहभाग असतो. जीवन हे ओल्या माती समान असते. त्याला आपण पाहिजे तो आकार देऊ शकतो.

आपल्या व्यक्तिगत जीवनात स्वतःच्या कोत्या अभिमानासाठी लढून स्वतःचे व देशाचे अकल्याण करणाऱ्या लोकांची यादी व कथा खूप मोठी आहे. जयचंद व मीर जाफर यांची उदाहरणे अशांचीच आहेत. शत्रूंचा बदला घेण्यासाठी ते कोणत्या थराला जातील आणि कोणता अनर्थ करतील याचा नेम नसतो. ईर्ष्येने आपल्या शत्रूंना धूळ चारण्यासाठी काहीही करणे त्यांनी बाकी ठेवले नाही. शत्रूसाठी भयंकर अग्निकांड रचून स्वतःही त्यात जळून राख झाल्याची उदाहरणे पुष्कळ आहेत. युद्धांच्या कथांच्या

मुळाशी अशीच दुष्प्रवृत्ती असते. त्यांना आपण दुःस्साहसी सुद्धा म्हणू शकतो.दुराचारी, आतंकवादी व कपट कारस्थानी लोक याचसाठी सतत खटाटोप करीत असतात.

आजच्या काळातील प्रश्न अगदी वेगळा आहे. सृजन आणि उन्नतीसाठी कोणाची सद्‌भावना किती प्रमाणात उंचबळते आहे? स्वार्थाऐवजी परमार्थ कोणास रूचत आहे? विनाशाला आमंत्रण देणारे लोक हे मिशांवर ताव देऊन फुशारकी मारतात. तसे करणे सृजन कार्य करणाऱ्यांना आवडत नाही. नवनिर्माणाचे कार्य करणाऱ्यांचा सुगंध चंदनासमान मंद असतो. त्यांचा सुगंध अगदी जवळ जाऊनच लक्षात येतो. विनाशाचा दुर्गंध समग्र क्षेत्रात दूर दूर पर्यंत पसरून आपले अस्तित्व जाणवून देत असतो. दुष्टपणाच्या वार्ता दूर दूर पर्यंत विना प्रयत्नाने पोहचतात व चर्चेचा विषय बनतात, तथापि सेवा-सद्‌भावनांचे कार्य मूठभर लोकांपर्यंतच पोहचते. सज्जनांना आपल्या सेवा कार्याची जाहिरातबाजी करणे आवडत नसते. दुराचारी-दुर्जनांना मात्र आपल्या गैरकृत्यांची चर्चा दूर दूर पर्यंत होत आहे, हे पाहून त्यांचा अहंकार फुलत जातो.

अशा परिस्थितीत सत्प्रवृत्ती संवर्धनासाठी अशा कथित क्वचित सद्‌भाव संपन्न लोकांचीच पावले त्या दिशेने वळतात. अनुकरणीय उदाहरण प्रत्यक्ष डोळ्यांसमोर नसल्याने आपला उत्साह सुद्धा शिथिल होतो. संचित कुसंस्कार आणि प्रचलित प्रथा-परंपरांचे अडथळे या मार्गात आडवे येतात. भंगलेल्या भवनांच्या अवशेषांतून नव्याने भव्य व आकर्षक महाल कसे उभे करावे? त्यासाठी सातत्याने सक्रिय राहून आवश्यक बांधकाम साहित्य कसे जमवायचे? हे प्रश्न समोर उभे राहतात.

करण्यासारखे तर एकच काम आहे; पण त इतके प्रचंड आणि व्यापक आहे की हजारो छोट्या-मोठ्या कामांची ते बरोबरी करू शकेल. पदार्थ जगतामध्ये बदल करणे सोपे असते. लोखंडासमान अती जड पदार्थाला वितळून दुसरा आकार देता येतो. कृत्रिम साधने व वेशभूषा देऊन कुरूप माणसाला सुद्धा सुंदरांच्या पंक्तीत बसविता येते. तथापि विचारांबद्दल काय म्हणावे? ते तर चिरकाळापासून कुकर्मामुळे स्वभावाचे अभिन्न अंग बनून राहिलेले असतात. सवयीप्रमाणे प्रयत्न न करताच कार्य करू लागतात. सर्वांना कळते की पदार्थ खाली पडला की पृथ्वीची आकर्षण शक्तीच आपला पूर्ण जोर लाऊन तिला खाली ओढत असते; पण पदार्थास वर उचलायचे तर संपूर्ण ताकत लावावी लागते. श्रेष्ठ कार्य करणाऱ्यांमध्ये अतिरेकी लोकांच्या तुलनेत मोठी शक्ती हवी असते. एखादे घर एका दिवसात मोडता येते; त्यासाठी एक फावडा पुरेसा होतो. पण तेच नवीन बांधावयाचे म्हटले तर त्यासाठी केवढे परिश्रम नि कौशल्य लावावे लागतात? श्रेय नि प्रतिष्ठा विध्वंसाला नव्हे तर सृजनालाच प्राप्त होते.

या काळात एकच महान कार्य समोर उभे आहे. ते म्हणजे प्रत्येक व्यक्तींच्या मन-बुद्धीत मुरलेल्या दुर्भावनांचे निरसन करणे आणि त्यासाठी केवढे शौर्य नि पराक्रम हवे! सारा सरंजाम जमविणे किती कठीण आहे!! केवळ तोंडी उपदेश करून हे साध्य होणार नाही. त्यासाठी तदनुरूप वातावरण हवे. त्यानंतर असे उपदेशक

हवेत की ज्यांचे आचार आणि विचार यात सुसंगती असेल. जनमनाला त्यांच्या प्रामाणिकतेची खात्री पटावी. मोठी बंदूकच योग्य प्रकारे लक्ष्य टिपू शकते. वाकडी तिकडी बंदूक हे कार्य करू शकत नाही. लहान मुलांचा लक्ष्यवेध अपयशी ठरतो. आपल्या व्यक्तिगत जीवनात सद्‌भावना आणि सद्‌विचार प्रगट करणारे लोकच इतरांना उन्नत करू शकतात. प्रगतिपथावर पुढे पुढे जाऊन सृजनशील कार्याचे ध्येय साध्य करू शकतात.

"विचारक्रांती" ही आजची सर्वात महत्त्वाची गरज आहे. निषिद्ध विचार चिंतनातूनच दारिद्र्य, निरक्षरता, रोगराई, दुष्टाचार व दुष्प्रवृत्तीचा उगम होत असतो. या आजारांचा वेगवेगळा उपचार फारसा प्रभावी होत नाही. रक्तशुद्धी केली तरच शरीरावरच्या पुळ्या-फोडे आपोआप दूर होतात. मुळांना पाणी दिले की झाड आपोआप मोठे होते. फांद्या, फळे, फुले यांनी बहरते. अनेकांना छाया देते. पानांवर पाणी शिंपडल्याने हे साध्य होत नाही. विकासाची आणि सुधारणेची अगणित कामे करणे आवश्यक आहे. त्यांचा वेगळा वेगळा विचार करण्यापेक्षा "वैचारिक निर्दोषता" साध्य झाली तर अगणित विकृतींचे उच्चाटन आपोआपच होऊ शकेल. कारण की वैचारिक भ्रष्टतेतूनच या सर्व विकृती निर्माण होत असतात. त्यामुळे उत्थान-पतनांचा खेळ सुरू होत असतो.विचारात शालीनता, सज्जनता, नीति-निष्ठा, कर्तव्यपरायणता आणि समाजनिष्ठा निर्माण करता आली तर, शरीराने व मन-बुद्धीने अशीच कामे होऊ लागतील की ज्यामुळे समाजाचा विकास व सुधारणा घडून येईल.

प्राचीन काळी घरोघरी अलख जागविणे, संपर्क साधणे

आणि विचार-विनिमय करणे, अशी मर्यादित कामे संपन्न होत असत. पण त्याद्वारे आपोआप जन-मनाचा विकास व पावित्र्य साध्य होत असे. अनेकांना एकत्र जमविण्यासाठी सामूहिक रीत्या कर्मकांड करण्याची प्रथा-परंपरा पडली. पण आता विज्ञानाने ती सर्व कामे फार सरळ नि सोपी करून टाकली आहेत. त्यांना योजनाबद्ध रूप देऊन मोठ्या प्रमाणावर ती संपन्न केली तर नवयुग निर्मितीचे प्रचंड नि विश्वव्यापी कार्य सुद्धा कठीण वाटणार नाही.

आपल्या काळाचे एक वरदान म्हणजे-प्रेस. त्याच्या माध्यमातून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त जनतेपर्यंत अल्पखर्चात विचार पोहचविणे शक्य झाले आहे. लाऊडस्पीकर, टेपरेकॉर्डर, व्हीडीओ, स्लाईड प्रोजेक्टर यासारख्या स्वस्त साधनांनी समाजपोषक उदात्त विचार अल्प वेळेत पोहचविणे शक्य झाले आहे. संगीत कला पथके जर योजनाबद्धपणे कार्य करतील तर त्यांच्याद्वारे जनजागरणाचे महान कार्य मोठ्या प्रमाणात संपन्न होऊ शकेल. या सारखीच इतर लहान-मोठी साधने सुद्धा शोधता येतील. उलट्या व चुकीच्या दिशेने वाहणारा विचार प्रवाह वळवून त्यास सुलट्या दिशेने वहावयास प्रेरित करू शकतील. हा प्रचार प्रतिभावंत लोकांच्या मदतीने तर उत्तम प्रकारे व व्यापक क्षेत्रात संपन्न होऊ शकेल.

एवढे करूनही एक अडचण पुनः जशीच्या तशी शिल्लक राहतेच. हे सर्व कार्य जनतेच्या अंतःकरणापर्यंत पोहचवून त्यांना क्रियाशील बनवू शकेल, ही अपेक्षा पूर्ण व्हायची असेल तर त्यासाठी प्रखर प्रतिभावंतांनीच पुढे आले पाहिजे व आघाडी सांभाळली पाहिजे.

हे कार्य हीन दर्जाचे लोक करू शकत नाहीत. कारण त्यांचे व्यवहार विसंगत असतात. म्हणून उपहासात्मक बनतात. दूरवर्ती अज्ञानी लोक कोणाच्याही वाचाळपणाला जास्त विश्वसनीय मानीत नसतात. आपल्या काया-वाचा-मनाने आदर्शांना समर्पित होतील. अशी नररत्ने शोधूनही सापडत नाहीत. या विसंवादामुळे जनमनात इच्छित परिवर्तन घडविता येत नाही आणि परिणामी इतर अनेक विडंबनांसारखाच धर्मोपदेशसुद्धा घटकाभरचे मनोरंजन बनून राहतो.

हीच अडचण दूर करावयाची आहे. परमेश्वराची दिव्य चेतना याच काळात अवतरित होणार आहे. त्यामुळे भावनाशील लोकांनी आपली मनाची दुर्बलता दूर सारून ब्राह्मणोचित जीवनाचा अंगीकार करावा. आपले जीवन व्यवहार आणि व्यक्तिमत्त्व अशा प्रकारे घडवावे की आपल्या क्षेत्रात आपल्या सहवासात येणाऱ्यांचा आपल्यावर विश्वास बसावा. उत्कृष्ट व आदर्शवादी आचार-विचार ही कल्पित गोष्ट नसून ती प्रत्यक्ष व्यवहारात आणता येते, याचे त्यांना प्रत्यक्ष दर्शन आपल्यातून घडावे.. त्यात तोटा आहे असे नाही. आर्थिक दृष्ट्या थोडी फार सुविधा-साधने कमी करावी लागतील इतकेच! परंतु त्यांच्या मोबदल्यात आत्मसमाधान, जनमानसात प्रतिष्ठा आणि दैवी अनुग्रहाची तीन वरदाने लाभतील. संकुचित, स्वार्थी जीवनात गुरफटून रडके-पडके, हीन-दीन जीवन जगण्यापेक्षा वरील तीन वरदाने किती महत्त्वाची आहेत याची कल्पना करावी.

पुढील काळात असेच व्हावे आणि होणारच आहे. भावना-

संवेदना फक्त कल्पना क्षेत्रातच राहू नयेत, त्या प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात साकार व्हाव्यात आणि यथाशक्ती त्यांचा प्रचार प्रसार करण्यात आपले सामर्थ्य नियोजित करावे.

प्रत्येक शुद्ध अंतःकरणात दैवी प्रेरणा व विचार हे अनायासे उचंबळत असतात. त्या शुभ संकल्पांना हृदयंगम करून प्रत्यक्ष कार्यरूपात साकार करणे हीच आजची महान आवश्यकता आहे, प्रखर प्रज्ञेची परिणती आहे.

प्रखर प्रज्ञा हाच परमेश्वराचा सर्वश्रेष्ठ कृपा-प्रसाद होय.

❀ ❀ ❀